कृत्रिम बुद्धिमत्ता, म्हणजे, आर्टिफिशियल इन्टेलिजन्स हा मानवाच्या जीवनातील भविष्यातील बदलाचा क्रांतिकारी टप्पा ठरणार असल्याने, साहजिकच त्याच्या गुणदोषांची चर्चा आता गांभीर्याने सुरू झाली आहे. ही नवी क्रांती माणसाचे जीवन अधिक सुसह्य करणार की सामान्य जगण्यासमोर संकटांचे डोंगर उभे करणार याची चिंताही व्यक्त होऊ लागली आहे. सुमारे दोन वर्षांपूर्वीच्या जुलै महिन्यात संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेत कृत्रिम बुद्धिमत्तेचे धोके या विषयावर झालेल्या परिषदेत ही चिंता उमटली होती. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरामुळे माणसाच्या जीवनशैलीत आमूलाग्र बदल होणार असल्याने मानवी व्यवहारांत त्याचे मूलभूत परिणाम होत राहतील, असे मत या परिषदेत ब्रिटनने नोंदविले होते, तर कृत्रिम बुद्धिमत्ता हा उधळलेला बेफाम वारू ठरू नये, अशी अपेक्षा चीनने व्यक्त केली होती. एका बाजूला कृत्रिम बुद्धिमत्तेच्या अविवेकी वापराच्या भीतीमुळे संभवणाऱ्या परिणामांची चिंता व्यक्त होत असताना, भारताने मात्र, या नव्या क्रांतीच्या विवेकी वापराचा आराखडा निर्माण करण्यास सुरुवातही केली होती. मानवी मेंदूला पर्याय ठरणारी ही नवी क्रांती केवळ संकटच ठरेल असे नाही, पण त्याचा गैरवापर रोखण्यासाठी जागतिक स्तरावर तंत्रज्ञानाच्या नियमनाची सूत्रे निश्चित केली नाहीत तर मात्र ते संकट ठरू शकेल, यावर या परिषदेत एकमत झाले होते, तेव्हा भारताच्या विविध क्षेत्रांतील कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराचे नीतिनियम निश्चित करण्याच्या प्रक्रियेसही सुरुवात झाली होती. तीन वर्षांपूर्वी, २०२२ मध्ये भारताच्या यजमानपदाखाली पार पडलेल्या, जगातील सर्वांत मोठ्या अर्थव्यवस्था असलेल्या राष्ट्रांच्या जी-२० या परिषदेत कृत्रिम बुद्धिमत्तेच्या जागतिक चिंता आणि त्यासंदर्भातील भारताचे महत्त्व व भूमिका जागतिक स्तरावर अधोरेखित झाली. त्या वर्षीच्या जी-२० परिषदेपाठोपाठ कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्राशी संबंधित असलेल्या जागतिक भागीदारी संघटनेचे अध्यक्षपदही भारताकडे आले होते. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून जबाबदार आणि मानवकेंद्रित विकास साधण्यासाठी कार्यरत असलेल्या ग्लोबल पार्टनरशिप ऑफ आर्टिफिशियल इन्टेलिजन्स (जीपीएआय) या आंतरराष्ट्रीय उपक्रमातही या क्षेत्रातील भारताच्या भरीव कामगिरीला मान्यता मिळाली होती. सामान्यजनांचे जीवनमान सुधारण्यासाठी तंत्रज्ञानाचा नैतिक वापर करण्यावर भर देणाऱ्या भारताच्या प्रयत्नांना मिळालेली ही जागतिक मान्यतेची पावती ठरली होती.

आज तीन वर्षांनंतर पुन्हा, जोहान्सबर्ग येथे भरलेल्या जी-२० परिषदेच्या त्याच मंचावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या जागतिक वापरासंबंधीच्या नैतिकतेचा पुनरुच्चार करून व्यापक समाजहिताच्या भारताच्या बांधिलकीचे दर्शन घडविले आहे. तंत्रज्ञानाच्या विकासाबरोबतच त्यावर काही मोजक्यांकडून प्रस्थापित होणारी मक्तेदारी हा चिंतेचा मुद्दा असून त्यामुळे जागतिक स्तरावर वाढलेले संघर्ष ही चिंतेची बाब असल्याच्या मताचा पुनरुच्चार करून, वित्तकेंद्रित वाटचालीचा मार्ग सोडून मानवकेंद्रित वाटचालीच्या मार्गावर वाटचाल करण्याचा आग्रह मोदी यांनी पुन्हा एकदा या परिषदेत केला. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर जागतिक कल्याणाकरिता करावयाचा असेल तर सामूहिक सामंजस्यातून त्याचा गैरवापर टाळावाच लागेल, ही भूमिका याच परिषदेत पुन्हा एकदा अधोरेखित झाल्याने, भारतात समाजमाध्यमांच्या मंचास भेडसावणाऱ्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या गैरवापराचा मुद्दा गांभीर्याने हाताळण्यावर भर देणे महत्त्वाचे ठरणार आहे. गेल्या काही वर्षांत समाजमाध्यमांवर कृत्रिम बुद्धिमत्तेच्या तंत्रज्ञानाने पुरता कब्जा मिळविला आहे. याचा वापर करून प्रामुख्याने चारित्र्यहनन व असत्य कथनाचा फैलाव मोठ्या प्रमाणावर होत असल्याचेही उघड होऊ लागल्याने, तंत्रज्ञान क्षेत्रातील ब्रह्मास्त्र म्हणून जन्माला आलेले कृत्रिम बुद्धिमत्तेचे तंत्रज्ञान बूमरँग ठरण्याची भीती या क्षेत्राला सर्वाधिक भेडसावू लागली आहे. डीप फेक आणि दहशतवादाकरिता कृत्रिम बुद्धिमत्तेचा होणारा वापर पाहता, या तंत्रज्ञानाच्या जन्मानंतर लगेचच सुरू झालेली भीती खरी ठरत असल्याची खात्रीदेखील पटू लागली आहे. त्यामुळेच या ब्रह्मास्त्राच्या गैरवापरास लगाम घालण्याकरिता जागतिक स्तरावर सहमती आणि सामूहिक प्रयत्नांकरिता पुढाकार घेण्यासाठी भारत सज्ज होत असल्याचे संकेत पंतप्रधानांनी या मंचावरून दिल्याने, पुन्हा एकदा भारताचे महत्त्व अधोरेखित होणार आहे. कोणत्याही विकसित तंत्रज्ञानाचा वापर हा संकुचित प्रादेशिक हितापेक्षा जागतिक हिताचा व्हावा ही भारताची विकासनीती यशस्वी होत असल्याचे अनेक दाखले आता समोर येऊ लागले आहेत. अंतरिक्ष संशोधन क्षेत्रात गेल्या काही वर्षांत भारताने केलेल्या प्रगतीच्या वाटचालीत जगातील अनेक देशांना सहभागी करून घेण्याची भारताची भूमिका हा त्याचा प्रत्यक्ष पुरावादेखील ठरला आहे यात शंका नाही. तीन वर्षांपूर्वीच्या दिल्ली येथील जी-२० शिखर परिषदेत भारताने मांडलेल्या भूमिकेस बळ देणारे नवे पाऊल टाकण्याची पुढची संधी या परिषदेच्या निमित्ताने भारतास मिळाली आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या नैतिक वापराच्या भारताच्या आग्रही भूमिकेचा जागतिक पुनरुच्चार अधिक प्रबळ करण्यासाठी येत्या वर्षांत फेब्रुवारी २०२६ मध्ये भारताच्या यजमानपदाखाली भरविल्या जाणाऱ्या कृत्रिम बुद्धिमत्ता परिणाम परिषदेचे सूत्र 'सर्वजन हिताय, सर्वजन सुखाय' हे असणार आहे. तीन वर्षांपूर्वीच्या जी-२० परिषदेच्या यजमानपदावरून भारताने 'वसुधैव कुटुम्बकम' हा भारतीय संस्कृतीच्या शिकवणीचा संदेश जगाला दिला होता आणि मानवकेंद्रित जागतिक विकासाची भारताची भूमिका जगाच्या गळी उतरविण्याच्या प्रक्रियेचे पाऊल टाकले होते. जागतिक स्तरावर मानसिकतेत बदल करून जगाला व्यक्तिकेंद्रित विकासनीतीची दिशा देण्याच्या भारताच्या या पुढाकारामुळे सहकार्य, शांतता, ऐक्य व मानवतेचा नवा संदेश देण्याकरिता जी-२० परिषदेचा मंच उपयुक्त ठरणार आहे. मानसिकतेतील बदलाची ही प्रक्रिया सोपी नाही. ते एक आव्हान आहे. सध्याच्या चौकटीत ते आव्हान पेलण्याची क्षमता नाही. त्यामुळेच, काही अपेक्षांचे ओझे संयुक्त राष्ट्रांच्या खांद्यावर देऊन पंतप्रधान मोदी यांनी नव्या बदलाच्या मानसिकतेची रुजवात केली आहे. संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेतच सुधारणा होणे आवश्यक असल्याची ठाम भूमिका या परिषदेत मांडून पंतप्रधानांनी सुधारणांसाठी आवश्यक असलेल्या जागतिक मतैक्याच्या प्रक्रियेचीही पायाभरणी केली आहे. जी-२० परिषदेत अमेरिकेच्या उपस्थितीमुळे काही राजनैतिक वादाची चिन्हे उद्भवत असताना, भारताच्या ठाम भूमिकेला मिळणारा पाठिंबा आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची प्रतिष्ठा उंचावणारा ठरेल, अशी अपेक्षा करावयास हरकत नाही. तसे झाले, तर नवतंत्रज्ञानाची ब्रह्मास्त्रे हाताळण्याचा मंत्रदेखील भारताला गवसलेला असेल. ▮

## आंतरराष्ट्रीय

# भारताच्या भीतीने चीनचा शस्त्रपुरवठा

प्रा. जयसिंग यादव

दोन देशांमध्ये संघर्षाचे परिणाम जगाला भोगावे लागत असतात. अशा वेळी मध्यस्थी करून संघर्ष मिटवण्याची अपेक्षा असते. शेजारच्या देशांनी त्यासाठी पुढाकार घ्यायचा असतो; परंतु चीन नेमके याविरोधात वागत असतो. 'दोघांत भांडण, तिसऱ्याचा लाभ' असे म्हटले जाते. भारत आणि पाकिस्तानमधील तीव्र संघर्षाकडे चीनने सुवर्णसंधी म्हणून पाहिले. अमेरिकेच्या अलिकडच्या एका अहवालानुसार, चीनने पाकिस्तानच्या सहकार्याने या संघर्षाचे रूपांतर त्यांच्या शस्त्रांच्या युद्धभूमी चाचणीत केले. त्यानंतर त्यांनी मुस्लिम देशांना शस्त्रे विकण्यासाठी या चाचणी निकालांचे अतिरंजित वर्णन केले. अहवालात म्हटले आहे की चीनने केवळ जमिनीवरच आपल्या शस्त्रांची चाचणी केली नाही, तर पाश्चात्त्य देशांविरुद्ध शस्त्रास्त्रांचा बाजार मजबूत करण्यासाठी जगभरात आक्रमकपणे त्यांचा प्रचार केला. मे २०२५ च्या संघर्षादरम्यान, चीनच्या अनेक प्रगत शस्त्रांचा वापर प्रत्यक्ष युद्धात पहिल्यांदाच करण्यात आला. यामध्ये एचक्यू-९ हवाई संरक्षण प्रणाली, पीएल-१५ हवेतून हवेत मारा करणारे क्षेपणास्त्र आणि जे-१०सी लढाऊ विमान यांचा समावेश आहे. भारतासमोर चीनची अनेक शस्त्रे निष्प्रभ ठरली; परंतु त्याची जगभर चर्चा होऊ नये, म्हणून आपली शस्त्रास्त्रे किती परिणामकारक ठरली, याचा आक्रमक प्रचार करून चीनने शस्त्रास्त्रांची जागतिक बाजारपेठ मजबूत करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी पाकिस्तानचा उपयोग करून घेतला. पाकिस्तानने मुस्लिम राष्ट्रांचे मत परिवर्तन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

पाकिस्तान-भारत संघर्षवेळी चीनची आधुनिक शस्त्रे सक्रिय लढाईत तैनात करण्याची ही पहिलीच वेळ होती आणि चीनने संपूर्ण संघर्षाचा वापर एक प्रकारचा 'फील्ड एक्सपिरीमेंट' म्हणून केला. अहवालानुसार, चीनने पाश्चात्त्य शस्त्रांविरुद्ध आपल्या उत्पादनांची विक्री करण्यासाठी पाकिस्तानच्या लष्करी यशाचा फायदा घेतला. पाकिस्तानचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्र मंत्री इशाक दार यांनी संसदेत दावा केला की पाकिस्तानी जे-१० सी विमानांनी राफेलसह भारतीय हवाई दलाची अनेक विमाने पाडली. अहवालात म्हटले आहे की पाकिस्तानचे हे दावे अतिशयोक्तीपूर्ण आहेत; परंतु चिनी दूतावासांनी जगभरात शस्त्रास्त्र विक्री वाढवण्यासाठी हे दावे केले. चीनने 'सोशल मीडिया'वरील बनावट खात्यांद्वारे 'एआय' व्युत्पन्न प्रतिमा आणि व्हिडीओ-गेम ग्राफिक्स भारतीय विमानांचे अवशेष म्हणून प्रसारित केले. फ्रेंच राफेलची प्रतिमा खराब करण्यासाठी आणि स्वतःच्या जे-३५ लढाऊ विमानांचा प्रचार करण्यासाठी याचा वापर करण्यात आला होता. फ्रेंच गुप्तचर यंत्रणेचा हवाला देत, अहवालात दावा केला गेला की चीनच्या प्रचार मोहिमेनंतर इंडोनेशियाने राफेल खरेदी प्रक्रिया थांबवली. अहवालात म्हटले आहे की पाकिस्तान चिनी शस्त्रांवर खूप अवलंबून आहे. जूनमध्ये चीनने पाकिस्तानला ४० जे-३५ लढाऊ विमाने, केजे-५०० आणि बॅलिस्टिक क्षेपणास्त्र संरक्षण प्रणाली विकण्याची ऑफर दिली. 'स्टॉकहोम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्यूट' च्या मते, गेल्या पाच वर्षांमध्ये पाकिस्तानच्या शस्त्रास्त्र आयातीपैकी ८१ टक्के शस्त्रे चीनमधून आली आहेत.



मध्य पूर्वेला चीनची वाढती शस्त्रास्त्र निर्यात चीनच्या व्यापक ऊर्जा सुरक्षेच्या प्रयत्नात रुजली आहे आणि ही प्रवृत्ती उदयोन्मुख बहुध्रुवीय जागतिक संरचना दर्शवते. जागतिक शस्त्रास्त्र बाजारपेठेत एक प्रमुख खेळाडू म्हणून चीनचा उदय 'पीपल्स लिबरेशन आर्मी' (पीएलए)च्या क्षमता वाढवण्याच्या प्रेरणेने झाला. परिणामी, त्यांनी त्यांच्या संरक्षण उद्योगात सुधारणा केल्या आहेत आणि त्यांची संरक्षण उपकरणे सुधारण्यासाठी लष्करी खर्च सातत्याने वाढवला आहे. शस्त्रास्त्र बाजारपेठेतील चीनची भूमिकादेखील बदलत्या सुरक्षा वातावरणाची जाणीव करून देते. २०१२ ते २०१६ दरम्यान जागतिक शस्त्रास्त्र निर्यातीत चीनचा वाटा ३.८ टक्क्यांवरून ६.२ टक्क्यांपर्यंत वाढला. २०१६-२०२० या काळात तो ५.२ टक्क्यांपर्यंत घसरला असला, तरी चीन जगातील पाचव्या क्रमांकाचा शस्त्रास्त्र निर्यातदार राहिला आहे. अमेरिका आणि रशियाच्या तुलनेत त्याचा वाटा माफक असला, तरी नवीन तंत्रज्ञानासह नवीन बाजारपेठेत प्रवेश करण्यास सज्ज आहे. 'सेंटर फॉर नेव्हल ॲनालिसिस'च्या विश्लेषणानुसार चीनने शस्त्रास्त्रनिर्यातीत एक स्थान निर्माण केले आहे. २०२० च्या अमेरिकन संरक्षण विभागाच्या अहवालानुसार, टनेजच्या बाबतीत चीन जगातील अव्वल जहाज उत्पादक देश आहे. चीन आघाडीवर असणारे आणखी एक क्षेत्र म्हणजे सशस्त्र ड्रोन. (ज्याला मानवरहित हवाई वाहने, यूएव्ही असेही म्हणतात). २०१८ पर्यंत चीनने जगभरातील १० हून अधिक देशांना जड आणि सशस्त्र यूएव्हीज निर्यात केले होते. चीनने पाकिस्तानी हवाई दलासह संयुक्तपणे चिनी विंग लूंग २ ड्रोन तयार करण्यास सहमती दर्शविली आहे.

२०१३ च्या 'एसआयपीआरआय' अहवालानुसार चीन लहान शस्त्रे आणि हलक्या शस्त्रांचादेखील एक प्रमुख निर्यातदार आहे. चीन शस्त्रास्त्रे खरेदी करणाऱ्या देशांना लवचीक 'पेमेंट स्ट्रक्चर्स'देखील ऑफर करतो. ते विकसनशील देशांसाठी आकर्षक आहे. शिवाय लष्करी उपकरणांच्या स्रोतांमध्ये विविधता आणू इच्छिणाऱ्या देशांनाही चिनी शस्त्रे चांगली वाटतात. चिनी उपकरणांची गुणवत्ता आणि टिकाऊपणाबद्दल साशंकता असली, तरी पैसे, सवलती आणि संबंधित देशांमधील राज्यकर्त्यांना लाच देऊन खरेदी करणे भाग पाडले जाते. चीनला प्रामुख्याने शस्त्रास्त्रनिर्यातीच्या राजकीय नव्हे, तर व्यावसायिक फायद्यांमध्ये रस आहे; शिवाय हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे, की या व्यवहारातले आर्थिक फायदे खूप मोठे असून शस्त्रास्त्र निर्यातदार असण्याचा प्रभाव, विशेषतः कमकुवत देशांवर राहणारा वरचष्मा तितकाच शक्तिशाली आहे. चीनची व्यापक मध्य पूर्व रणनीती अशा उद्दिष्टांना समर्थन देते. २०१६ मध्ये त्यांनी अरब पॉलिसी पेपर जारी केला आणि मध्य पूर्वेला आपल्या 'बेल्ट ॲण्ड रोड इनिशिएटिव्ह'चा एक महत्त्वाचा भाग बनवले. मध्य पूर्वेतील अस्थिर प्रादेशिक परिस्थितीमुळे या प्रदेशातील देशांसोबत चीनच्या ऊर्जा सहकार्याला धोका वाढतो. हे अशा वेळी घडत आहे, जेव्हा अमेरिका मध्य पूर्वेवरील आपले लक्ष कमी करून इंडो-पॅसिफिक क्षेत्रावर पुन्हा लक्ष केंद्रित करत आहे.

मध्य पूर्वेमध्ये, चिनी ड्रोन्स विशेष लोकप्रिय आहेत. इजिप्त, इराक, जॉर्डन, सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती या सर्वांना विंग लून आणि सीएच-४ ड्रोनसह सशस्त्र चिनी यूएव्ही मिळाले आहेत. अशा प्रकारे चीन मध्य पूर्वेतील यूएव्ही शस्त्रास्त्रांच्या शर्यतीला चालना देत आहे. शिवाय, अमेरिकेने मध्य पूर्वेतील अरब देशांना सशस्त्र ड्रोन विकण्यासाठी प्रतिबंधात्मक निर्यात धोरण लागू केले आहे. चीनने या संधीचा फायदा घेत या प्रदेशात आपली उपस्थिती वाढवली आहे. अमेरिकेने जॉर्डनला प्रीडेटर एक्सपी ड्रोन देण्यास नकार दिला. त्यानंतर हा देश सीएच-४ बी ड्रोन खरेदी करण्यासाठी चीनकडे वळला. इराकनेही अशीच भूमिका घेतली. अमेरिकेचा दृढ मित्र असलेला सौदी अरेबिया हा चिनी शस्त्रास्त्रांच्या सर्वोच्च आयातदारांपैकी एक आहे. सौदी अरेबियाने चिनी डीएफ-२१ बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे आणि विंग लूंग ड्रोन खरेदी केले आहेत. तसेच चीनने सौदी अरेबियामध्ये संयुक्तपणे सीएच ड्रोन तयार करण्याचा करार केला आहे. सौदी अरेबिया सध्या चीनला होणाऱ्या तेलाचा सर्वोच्च पुरवठादार आहे. या वस्तुस्थितीवर आधारित हे संबंध आहेत. इराण हा चिनी शस्त्रास्त्रनिर्यातीचा पहिला खरेदीदार होता. आतापर्यंत चीनने इराणला सिल्कवर्म आणि सी-८०२ क्षेपणास्त्रे विकली आहेत. ही दोन्ही जहाजविरोधी क्षेपणास्त्रे आहेत. शिवाय, इराणी बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे चिनी डिझाईनवर आधारित विकसित केली गेली आहेत. चिनी तंत्रज्ञांनी या विकासात मदत केल्याचे वृत्त आहे. ▮

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

चंद्रकांत लोहाणा

# चिंता वाढविणारी अपघात-मालिका

रस्त्यावर होणाऱ्या अपघातांची स्थिती भारतामध्ये अतिशय चिंताजनक असून, दरवर्षी अपघातांमध्ये लाखो लोकांना आपले प्राण गमवावे लागतात. रस्ते अपघातांमध्ये जगात भारताचा ११ वा क्रमांक लागतो. रस्त्यावर होणारे अपघात हे ९० टक्के मानवी चुकांमुळे होत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामध्ये वाहतूक नियमांचे पालन न करणे, निष्काळजीपणे वाहन चालविणे, वेगावर नियंत्रण नसणे, मोबाईल फोनचा अति वापर व मद्य प्राशन करून वाहन चालविणे ही प्रमुख कारणे आहेत. देशामध्ये व्यावसायिक वाहनांमध्ये भारमर्यादेचे पालन होत नसल्यानेही अपघाताचे प्रमाण अधिक वाढले आहे. देशामध्ये २०२० मध्ये १ लाख ५१ हजार ११३ अपघात झाले असून, त्यामध्ये १ लाख ३१ हजार ७१४ लोकांचा मृत्यू झाला आहे. त्यामध्ये राष्ट्रीय महामार्गावर ५३ हजार ८७२ अपघात तर मृत्यूची संख्या ४७ हजार ९८४ एवढी आहे. अपघातामध्ये राष्ट्रीय महामार्गाचा वाटा ३५.७ टक्के असून, मृत्यूची टक्केवारी ३६.४ आहे. राज्य महामार्गावर ३८ हजार ४७२ अपघात झाले असून, त्यामध्ये ३३ हजार १४८ लोकांचा मृत्यू झाला आहे. अपघातामध्ये राज्य महामार्गाचा वाटा हा २५.५ टक्के असून, मृत्यूची टक्केवारी २५.२ एवढी आहे. याचाच अर्थ भारतामध्ये दरवर्षी रस्ते अपघातामध्ये लाखो लोकांचा बळी जात असून, जखमी व कायमचे अपंगत्व येणाऱ्यांची संख्या तर त्यापेक्षाही अधिक आहे.

अपघात का होतात हे प्रत्येक वाहनचालकांना माहीत असते. तरीही रस्त्यावर अपघात घडतातच. आजकाल देशामध्ये हायस्पीड वाहनांची संख्या अतिशय वाढली आहे. त्यामुळे वेगावर कोणतेही नियंत्रण राहले नाही. प्रत्येकाला इच्छित स्थळी पोहोचण्याची घाई असते. आयुष्यामध्ये ही स्पर्धा कधीतरी जीवावर बेतते. अपघात होण्यासाठी काही सेकंदाचाच अवधी पुरेसा ठरतो आणि अघटित घटना घडते. अपघात हे कुटुंब, समाज आणि राष्ट्राची हानी करणारे असतात. तरीही देशामध्ये लोकांचा अपघाताकडे बघण्याचा दृष्टिकोन अजूनही बदललेला नाही. अपघात घडल्यावर काही तासांच्या चर्चेनंतर सर्व काही सुरळीत होऊन जाते. घडलेल्या घटनांचे विश्लेषण करून त्यापासून काहीतरी शिकावं हे आम्हा भारतीयांच्या रक्तातच नाही. त्यामुळे अपघाताच्या मालिका सतत सुरू राहतात. अपघातामध्ये घरामधील एखादा कर्ता पुरुष दगावला तर संपुर्ण कुटुंब उघड्यावर येतं. त्या कुटुंबाची पार वाताहत होते. खेळण्या-बागडण्याचे दिवस असणाऱ्या किंवा शिक्षण घेणाऱ्या दहावी, बारावीच्या मुलांवर घर सांभाळण्याची जबाबदारी येऊन पडते. ज्या कुटुंबाचा काहीएक दोष नसतो त्या कुटुंबास आयुष्यभर नरक यातना भोगून जीवन जगावे लागते. प्रत्येक चालकाने ही जाणीव ठेवल्यास अपघाताचे प्रमाण निश्चित कमी होऊ शकते. रस्ते अपघातामध्ये दुचाकीच्या अपघाताचे प्रमाण दिवसेंदिवस वाढीस लागले आहे. रस्त्यावर बेधुंद गतीने धावणाऱ्या दुचाकी अपघातास सर्वाधिक कारणीभूत ठरत आहेत. कोवळ्या वयामध्ये हाती आलेली दुचाकी रस्त्यावर स्टंट करीत धावताना आजकाल सहज दिसून येते. कोवळ्या वयामध्ये वेगवान गतीची हौस असली तरी एखाद्या बिकट समयी मेंदूची कार्यक्षमता पूर्णपणे विकसित झालेली नसल्याने लहान मुलांची निर्णयक्षमता त्यावेळेस दगा देते आणि अपघातास आमंत्रण देणारी ठरते. किती पालक या बाबीचा अभ्यास करून आपल्या मुलांच्या हातामध्ये दुचाकी देत असतील ही शंकाच आहे. रस्ते अपघामाध्ये खराब रस्त्याचाही काही वाटा असला तरी सर्वाधिक मानवी चुकाच अपघातास कारणीभूत ठरत असल्याचे निदर्शनास आले आहे. मद्य प्राशन केल्यानंतर मनुष्याचा मेंदूवरील ताबा पूर्णपणे सुटतो. त्यामुळे अशी अनियंत्रित झालेली व्यक्ती जर वाहन चालवीत असेल तर रस्त्यावर पुढे काय घडणार हे सांगण्यासाठी कोण्या भविष्यवेत्त्याची गरज नाही. आपला जवळच्या व्यक्तीचा अचानक झालेला मृत्यू अतिशय धक्कादायक व दुःखद असतो. जाणारा आपल्या मागे बरेच काही सोडून जातो. नंतर ते सावरायला अख्खं आयुष्यही कमी पडतं. अपघातामध्ये दगावणारी व्यक्ती ही आपल्या कुटुंबासाठी आणि राष्ट्रासाठी कायम अमूल्य असते. ही जाणीव ठेवून नियमांचे पालन करून वाहन चालविल्यास अपघातरूपी लागलेला कलंक सहज पुसला जाऊ शकतो. ▮

९८८१७१७८५६

## इतस्ततः


# कंत्राटी पद्धत : पालन आणि निर्मूलन

दत्तात्रेय आंबुलकर

कंत्राटी कामगार पद्धत हा मुद्दा उद्योग-व्यवसायच नव्हे, तर न्यायालयीन-प्रशासन क्षेत्रापर्यंत नेहमीच विविध संदर्भांसह चर्चेत राहिला आहे. बरेचदा कामगार संघटनांनी कंत्राटी कामगार पद्धत आणि त्याची अंमलबजावणी हे मुद्दे संघटनात्मक पातळीपासून न्यायालयीन लढ्यापर्यंत लावून धरले आहेत. या साऱ्यामध्ये कामगारांची कंत्राटदारांकरवी विशिष्ट वा विशेष कामासाठी नेमणूक करणे, हा नेहमीच कळीचा वा काळजीचा मुद्दा राहिलेला दिसतो. कधी केवळ उत्पादनक्षेत्रापुरती वा विशिष्ट काम वा व्यावसायिक कालावधीसाठी वर्षानुवर्षे प्रचलित असणारी कंत्राटी कामगार पद्धत आता उद्योग-व्यवसायात कायमची स्थिर झाली आहे. या पृष्ठभूमीवर आणि विशेषतः नव्या कामगार कायद्यांतर्गत कंत्राटी कामगार पद्धतीशी संबंधित पद्धत आणि तरतुदींचा अभ्यास करून तिची अंमलबजावणी करणे, सर्वच संबंधित आस्थापना आणि व्यवस्थापनासाठी आता अनिवार्य ठरले आहे. नव्या तरतुदींनुसार कंत्राटी कामगार कायदा, १९७०मध्ये पालन आणि निर्मूलन या मोठ्या महत्त्वाच्या तरतुदी आहेत. या तरतुदींनुसार महाराष्ट्रासारख्या राज्यात ज्या कारखाने वा आस्थापनांमध्ये ५०वा त्याहून अधिक कंत्राटी कामगार असतील, अशा ठिकाणी कंत्राटी कामगार कायदा,१९७०च्या नव्या तरतुदी लागू होणार आहेत. याच कायद्याच्या कलम १०नुसार विशिष्ट उद्योगांतर्गत कंत्राटी कामगार पद्धत का आणि कशा प्रकारे व कशा पद्धतीने बंद करता येऊ शकते, याची तरतूद करण्यात आली असून, यासंबंधीचे सारे अधिकार संबंधित राज्य सरकारांना देण्यात आले आहेत.

काही विशिष्ट उद्योगांसाठी कंत्राटी कामगार कायदा व त्यातील नियमांसंबंधी निर्णय घेण्याचे अधिकार केंद्र सरकारला देण्यात आले आहेत. याशिवाय, अशा निवडक उद्योगांमधील कंत्राटी कामगारांनी संघटना स्थापन करून काही मुद्दे अथवा काही तक्रारी मांडण्यास त्याचे निराकरण करण्याचे अधिकार व जबाबदारी केंद्रीयस्तरावर केंद्रीय कामगार खाते व न्यायालयावर सुपूर्द करण्यात आले आहेत.

या पृष्ठभूमीवर कारखाना आस्थापनांसह विविध उद्योगांतर्गत प्रचलित कंत्राटी प्रथा, पद्धती व त्याच्याशी निगडित प्रमुख मुद्यांवर वेळोवेळी व्यवस्थापन, कामगार संघटना व कंत्राटी कामगारांतर्फे कामगार अधिकाऱ्यांपासून कामगार न्यायालये, उच्च-न्यायालय व थेट सर्वोच्च न्यायालयांपर्यंत उभय बाजूंनी लढा देण्यात आला व त्यातूनही कंत्राटी कामगार पद्धतीला वेगळे बदलते स्वरूप प्राप्त झाले, हे पाहणे महत्त्वाचे ठरते. कंत्राटी कामगारांशी संबंधित विविध प्रश्न आणि मुद्दे व त्यावरील व्यवस्थापनाची भूमिका आणि त्यांच्याशी संबंधित न्यायविद्-न्यायाधीशांनी घेतलेली विविध महत्त्वपूर्ण प्रकरणे आणि मुद्यांचा समावेश करता येईल. गुजरात इलेक्ट्रिसिटी बोर्ड विरुद्ध हिंद मजदूर सभा (१९९५), परिमल चंद्र शहा विरुद्ध आयुर्विमा महामंडळ (२००३), दीनानाथ विरुद्ध नॅशनल फर्टिलायझर्स लि. (१९९२), स्टील ॲथॉरिटी ऑफ इंडिया विरुद्ध नॅशनल वॉटरफ्रंट वर्कर्स (२००१) या आणि अशा प्रकारचे कंत्राटी कामगार व त्याच्याशी निगडित न्यायालयीन निर्णयांमुळे कंत्राटी कामगार कायद्याला वेळोवेळी वेगळे स्वरूप मिळत गेले. यातूनच कामगार संघटना, कामगार विषयांशी संबंधित शासन-प्रशासन, कामगार नेते- कायदेतज्ज्ञ, न्यायाधीश, उद्योग-व्यवस्थापनाचे प्रतिनिधी आणि संघटना इत्यादींचे विविध कामगार कायदे आणि नियम-पद्धती यामध्ये नव्याने विचार करून सुधारणा करण्याचा विचार प्रसंगानुरूप प्रबळ होत गेला. यातूनच प्रदीर्घ काळ झालेल्या चर्चा-विवाद, संघटनात्मक मुद्दे व व्यवसायाशी संबंधित घटकांच्या विचारातून केंद्र सरकारतर्फे नव्याने कामगार कायद्यांमध्ये सुधारणा करण्यात आल्या.



या नव्या कामगार कायद्यांतर्गत कंत्राटी कामगार पद्धतीशी संबंधित नव्याने बदललेल्या पद्धती व तरतुदी पुढीलप्रमाणे सांगता येतील-

**कामगार सुरक्षा, आरोग्य व कामकाज पद्धती नियम २०२०** : या नव्या कामगार कायद्यांच्या ११व्या कलमांतर्गत पहिल्या प्रकरणात नमूद केल्यानुसार कंत्राटी कामगारांशी संबंधित तरतुदींचा प्रामुख्याने समावेश केला गेला.

या नव्या वैचारिक तरतुदींनुसार कामगारांची कंत्राटी पद्धतींनुसार नेमणूक व वापर संबंधित उद्योग व आस्थापनांच्या मूळ व मूलभूत व्यवसाय प्रक्रिया वा पद्धतीला सोडून अन्य व आनुषंगिक कामांसाठी केला जाईल. यामध्ये मुख्यत्वेकरून आस्थापनांतर्गत साफसफाई, सुरक्षाव्यवस्था, भोजनव्यवस्था, रूग्णालय, प्रशिक्षण विभाग, कार्यालयीन सेवा-स्वच्छता, आस्थापनांतर्गत वाहतूकव्यवस्था वा तत्सम पद्धतींचा समावेश केला गेला हे विशेष. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर उद्योगांमधील कंत्राटी कामगार पद्धतीशी संबंधित असणाऱ्या सर्वच घटकांना विषय स्पष्टता लाभली. याच अनुषंगाने कंत्राटी कामगार कायद्याच्या नव्या तरतुदींनुसार ज्या उद्योग-व्यवसायात एखादे काम करण्यासाठी परंपरागत स्वरूपात कंत्राटी कामगारांचा उपयोग मूळ अथवा आनुषंगिक कामांसाठी करण्यात येत असेल, विशिष्ट प्रकारच्या कामांसाठी नियमित वा पूर्णकालीन प्रकारच्या कामगारांची आवश्यकता वा गरज नसेल, मर्यादित तास किंवा कालावधींसाठी अधिक कामगारांची गरज भासत असेल अथवा अचानक कामकाज व व्यावसायिक गरजांपोटी अधिक कामगारांची गरज भासत असेल, तर अशा विशिष्ट स्थिती-परिस्थितीमध्ये कंत्राटी कामगारांची नेमणूक करण्याची मुभा देण्यात आली आहे.

ऐतिहासिक संदर्भात व अभ्यासाच्या पूर्व संदर्भासह सांगायचे म्हणजे, दुसऱ्या राष्ट्रीय श्रमिक आयोगाच्या प्रमुख व अभ्यासपूर्ण शिफारसींनुसार कंत्राटी कामगारांबद्दल प्रामुख्याने दोन मुद्द मांडले होते- उद्योग आस्थापनांच्या मूळ, मुख्य प्रक्रिया वा उत्पादन कामामध्ये कंत्राटी कामगारांचा वापर केला जाऊ नये.

सारख्याच प्रकारचे काम करणाऱ्या नियमित कामगार व कंत्राटांमार्फत वा कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या कामगारांना एकसारखे म्हणजेच समान वेतन देणे आवश्यक करावे. यापैकी पहिल्या शिफारसीचा नव्या कंत्राटी कामगार कायद्यांमध्ये समावेश करण्यात आला असून, नियमित वा मूलभूत कामकाजात कंत्राटी कामगारांच्या नेमणुकीवर नियंत्रणे घालण्यात आली आहेत. हीच बाब किमान वेतन, कामाचे तास, सुरक्षा, आयोग इत्यादीच्या बाबतीत पण दिसून येत असून, नव्या कामगार कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी पूर्वतयारी म्हणून या विषयाकडे विशेषतः व्यवस्थापक व व्यवस्थापनांनी लक्ष देणे आवश्यक ठरते. ▮

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## आजचे संघगीत-९३

मंगळवार, २५ नोव्हेंबर २०२५

### हा अखंड नंदादीप जळणार सतत जळणार

हा अखंड नंदादीप जळणार सतत जळणार
हा असाच तेवत जगती, निज प्रकाश नित देणार ॥धृ.॥

जळत जळत जरि आत्मनाश हो जीवन सार्थकता
ही घोरनिराशातमविनाश हो ध्येय अंतरी राही
हा प्रदीप्त नंदादीप अवनीस प्रकाशविणार ॥१॥

चिरकाल जळत असणे इतरांसहि चेतविणे
हे कार्य सतत करणे दशदिशा प्रकाशविणे
आकांक्षा धरुनी चित्ती हा जळत जळत जळणार ॥२॥

प्रलय वादळी नंदादीप मुळिं न थरथरे असे ज्वलंत
ज्वालामुखिपरि वरुनि शांत हा दया क्षमा ठेवी थोर!
गंभीर मनी खंबीर प्रज्वलित राष्ट्र करणार ॥३॥

एक दीप दुसऱ्यास चेतवी ऐसे अगणित होती
जागृत हा राष्ट्रास जागवी देउनि जीवनस्फूर्ती
हा एकच नंदादीप पण दीपमाळ करणार ॥४॥

### अंधश्रद्धा संपणार कधी?

महान समाजसुधारक आणि संतांची परंपरा असलेल्या पुरोगामी महाराष्ट्रातील अंधश्रद्धा संपणार कधी असा प्रश्न पडतो. महाराष्ट्र हे देशातील प्रगतिशील राज्य समजले जाते, पण याच राज्यात काही लोक अंधश्रद्धेच्या आहारी गेले आहेत. आजचे युग हे विज्ञानाचे आहे आणि या विज्ञान युगातही काही लोक भूतप्रेत, जादूटोणा, करणी, भानामती, चेटकीण, हडळ, गुप्तधन, पुनर्जन्म, पाप-पुण्य, स्वर्ग-नरक अशा भ्रामक कल्पनांना चिकटून बसलेले दिसतात. भोंदूबाबांनी तर आपल्या राज्यात उच्छाद मांडला आहे. अशिक्षितच नाही तर सुशिक्षित लोकही भोंदूबाबांच्या हातचलाखीला फसतात. भोंदूबाबांकडून फसवणूक झाल्याची एकतरी बातमी वर्तमानपत्रात वाचायला मिळतेच. अंनिससारख्या संघटना आपल्या परीने भोंदूबाबा आणि अंधश्रद्धेविरुद्ध जनजागृती करत असतात तरीही काही लोकांमध्ये अजूनही सुधारणा होताना दिसत नाही. ते अजूनही अंधश्रद्धेला कवटाळून बसले आहेत. २०१३ मध्ये महाराष्ट्रानेच सर्वप्रथम जादूटोणाविरोधी कायदा पारित केला. जादूटोणाविरोधी कायदा पारित करूनही समाजातील अंधश्रद्धा कमी होत नाही. जादूटोणाविरोधी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी व्हायला हवी.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

## वाचक पत्रे

### वाहन फिटनेस शुल्कवाढ : मूळ प्रश्नावर वरवरची मलमपट्टी

पंधरा वर्षांऐवजी आता दहा वर्षांनी फिटनेस बंधनकारक करताना फिटनेस फी देखील वाढवण्याचा निर्णय एमओआरटीएचने लागू केला असला, तरी प्रत्यक्षात या धोरणाचे परिणाम पूर्णपणे वेगळेच दिसून येण्याची शक्यता आहे. या नवीन नियमांमुळे वाहन उद्योगाची उलाढाल व कर महसूल दोन्हीची वाढ निश्चित होईल, पण रस्त्यांवरील वाहनसंख्या कमी होण्याची शक्यता कमी आहे.

जुन्या वाहनांच्या भंगार धोरणाला बळकटी देणे आणि जुन्या इंजिनमधून होणारे कार्बन उत्सर्जन रोखणे या उद्दिष्टांसाठी हे नवीन नियम लागू केल्याचे बोलले जाते; पण याच नियमांमुळे नवीन वाहनांच्या आयुर्मानावर परिणाम होऊ शकतो. आजचे नवीन वाहन १५ ते २० वर्षे सहज चालू शकते. पण दहा वर्षांनंतर अनिवार्य फिटनेस चाचणी आणि त्यासाठी वाढलेली फी लक्षात घेतली तर वाहन उत्पादक यापुढे जाणीवपूर्वक वाहनांचे आयुष्य कमी करू शकतील म्हणजेच वाहन दहा वर्षांच्या आसपासच बदलण्याजोगे बनेल आणि नागरिकांना नाईलाजाने नवी गाडी घ्यायची सवय/गरज लागेल. यामुळे वाहन उद्योगाची विक्री वाढेल आणि विविध करांच्या माध्यमातून सरकारचे महसूल उत्पन्न वाढेल, पण पर्यावरण, रहदारी आणि पार्किंग समस्या या मुद्यांवर सकारात्मक परिणाम होणार नाही. याशिवाय वाढत्या वाहन निर्मितीसाठी नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर आणि त्यामुळे होणारे कार्बन उत्सर्जन देखील वाढेल. खरे धोरणात्मक उपाय म्हणजे वाहनसंख्या नियंत्रण, प्रत्येक घरी वाहनसंख्येवर मर्यादा, सक्षम व किफायतशीर सार्वजनिक वाहतूक, पर्यावरणीय धोरणाचा कडक अंमल आणि लोकसंख्यावाढीवर नियंत्रण. फक्त फिटनेस फी वाढवून समस्या पूर्णपणे सुटणार नाही; उलट नागरिकांवर आणखी आर्थिक बोजा, वाढती वाहनसंख्या आणि पर्यावरणाचा ऱ्हास असा चक्रव्यूहच निर्माण होईल. ▮

**अनिकेत शेटे**/पुणे

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१**
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लातूर मनपात कार्यशाळा; आयुक्तांचे मार्गदर्शन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २५ नोव्हेंबर :** ई ऑफिस प्रणाली या विषयावर लातूर मनपात एकदिवसीय कार्यशाळा संपन्न झाली.आयुक्त श्रीमती मानसी यांनी यावेळी मार्गदर्शन केले.

महानगरपालिकेतील सर्व प्रशासकीय कामकाज पूर्णपणे डिजिटल पद्धतीने, अधिक वेगवान आणि पारदर्शक बनवणे हा या कार्यशाळेच्या आयोजनामागचा उद्देश होता. ई-ऑफिस प्रणालीच्या माध्यमातून फाईल प्रक्रिया, पत्रव्यवहार, मंजुरी प्रक्रिया नोंदी ठेवणे तसेच दस्तऐवजांचे डिजिटल व्यवस्थापन अधिक सुलभ व सुटसुटीत होणार आहे.

प्रारंभी आयुक्त श्रीमती मानसी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना त्यांनी ई ऑफिस प्रणालीची गरज, शासनाच्या डिजिटलायझेशन धोरणाची अंमलबजावणी तसेच नागरिकांना मिळणाऱ्या जलद आणि पारदर्शक सेवांची माहिती दिली.

यावेळी ऑफिस पोर्टलमध्ये लॉगिन व युजर व्यवस्थापन,नवीन फाईल तयार करून पाठवणे,ई नोटींग व इतर ड्राफ्टिंग, दस्तऐवज अपलोड व ट्रेकिंग,मंजुरी प्रक्रिया, डिजिटल पद्धतीने पूर्ण करणे,प्रलंबित फाईल्सचे निरीक्षण व मॉनिटरिंग यांचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले.



# लातूरच्या वाहतूक समस्येवर उपाय आहे, पण अंमलात आणणार कोण..?

**त.भा. वृत्तसेवा/श्रीधर स्वामी**

**लातूर, २५ नोव्हेंबर :** लातूर शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीवर-समस्येवर कधी एकदा कायमचा तोडगा-उपाय शोधला जातो आणि आपण या वाहतुकीच्या समस्येतून मुक्त होऊ? असा विचार या कारणामुळे दररोज मनःस्ताप सोसणाऱ्या प्रत्येक सुजाण लातूरकरांच्या मनात येतो. कोणत्याही प्रश्नाची - समस्येची उकल अंतःकरणातून करण्याचा निर्धार केल्याशिवाय ती समस्या पूर्णतः सुटू शकत नाही. याचा अर्थ आजपर्यंत या समस्येचे समाधान या माध्यमातून शोधण्याचा प्रयत्नच केला गेला नाही, असे म्हटल्यास ते अतिशयोक्तीचे होणार नाही. मात्र, यावर एक नाही अनेक उपाय, पर्याय अंमलात येऊ शकतात. पण त्याच्या अंमलबजावणीसाठी पुढे होणार तरी कोण..? हा खरा प्रश्न आहे.

आजमितीस लातूरच्या मुख्य रस्त्यावरच नव्हे तर अगदी गल्ली बोळातही वाहतुकीची कोंडी होताना सर्रास पाहायला मिळते. सायंकाळच्या सुमारास तर वाहतुकीची कोंडी पाहून जीव अक्षरशः मेटाकुटीला येतो. यादरम्यान गंज गोलाईत वाहनांऐवजी पायी चालत जायचे म्हटले तरी अनेकांची हिंमत होणार नाही. वाहतुकीची कोंडी एवढी भयाण होते की, पायी चालणेही अवघड होऊन जाते. लातूरच्या या वाहतूक कोंडीवर अनेकांना पीएचडी. सुद्धा करता येईल असेही उपहासाने म्हटले जात असल्याचे अनेकदा ऐकावयास मिळाले आहे. ते वास्तवही आहे, याची प्रचिती अनेकांना आलेली आहेच.

शहरातील विविध भागात दिवसातून अनेकवेळेस वाहतुकीची कोंडी होते. वाह-



तूक अक्षरशः जाम होऊन जाते. अशावेळी रुग्णवाहिकेतून एखाद्या अत्यवस्थ रुग्णाला रुग्णालयापर्यंत पोहोचविणेही दुरापास्त होऊन जात असल्याचे अनुभवास आले आहे, याबाबतीत काहीच दुमत नाही. लातुरातील गंज गोलाई, छत्रपती शिवाजी महाराज चौक, राजीव गांधी चौक, कन्हेरी चौक, वसंतराव नाईक चौक, औसा बाह्यवळण रस्त्यावरील छत्रपती चौक, पाच नंबर चौक, अहिल्यादेवी होळकर चौक अशा अनेक चौकात गर्दीच्या वेळी मुख्यतः दररोज सायंकाळच्या वेळेस एवढी वाहतुकीची कोंडी होते की विचारता सोय नाही. वाढत्या वाहतुकीच्या तुलनेत शहर वाहतूक पोलीस शाखेकडे आवश्यक तेवढे मनुष्यबळ उपलब्ध नाही, असे सांगण्यात येते. जे मनुष्यबळ उपलब्ध आहे त्यापैकी बहुतांश पोलीस कर्मचारी शहराच्या विविध भागात वाहनधारकांच्या कागदपत्रांची तपासणी, वसुली मोहिमेत व्यस्त असल्याचे पाहावयास मिळते. वसुली, मग ती शासकीय असते की निमशासकीय? याबद्दल स्पष्ट शब्दात न बोललेलेच बरे.

लातूर शहरातील वाहतूक समस्येत सिग्नलची भूमिकाही अतिशय महत्वाची आहे. शहरातील अनेक भागातील सिग्नल केवळ शोभेच्या बाहुलीसारखे आहेत म्हणायला आहेत, एवढ्यासाठीच असल्याचे वर्षानुवर्षे



पाहायला मिळते. शहरातील अनेक भागात अद्यापही सिग्नल्सची आवश्यकता आहे. परंतु कार्यक्षम (?) प्रशासन अशा मागण्यांकडे कधीही गांभीर्याने पाहत नसल्याचे दिसून येते. प्रशासन योग्य ती उपाय योजनाही करत नाही किंवा त्यासंदर्भांत त्वरित काही निर्णयही घेत नाही, याला म्हणायचे तरी काय? असा प्रश्न आता सामान्य नागरिकांपुढे निर्माण होताना दिसतोय.

छत्रपती शिवाजी महाराज चौकातील वाहतुकीची कोंडी त्या ठिकाणी एखादा वा-



हतूक शाखेचा पोलीस कर्मचारी वाढवून दूर करता येऊ शकते. फक्त तेथे कोणत्या वेळेस कोणत्या रस्त्यावरून येणारी वाहतूक खुली करायची आणि कोणती वाहतूक रोखून धरायची याचे तारतम्य बाळगणे आवश्यक आहे. औसा रोडकडून येणारी वाहतूक खुली केली की, अंबाजोगाई रस्त्याकडून येणाऱ्या वाहनांमुळे वाहतूक विस्कळीत होणार नाही, अन्य वाहनचालक आपले वाहन मध्येच दामटण्याचा प्रयत्न करणार नाहीत याकडेही लक्ष देणे आवश्यक असते. त्याकरिता छत्रपती शिवाजी महाराज चौकातील सिग्नल व्यवस्था अद्यावत करून त्या ठिकाणी मनुष्यबळ वाढविणे अतिशय गरजेचे आहे. एकही वाहन लाईन सोडून पुढे जाणार नाही, तसेच वाहनधारकांनी शिस्त पाळली पाहिजे यासाठीही वाहतूक शाखेने सर्वतोपरी प्रयत्न करणे आवश्यक बनल्याचे दिसून येते.

वाहतूक पोलीस कर्मचारी डोळ्यासमोर दिसत असतानाही ट्रिपल सीट जाणे, त्यांच्यासमोर विरुद्ध दिशेने बिनधास्तपणे निघून जाणे, सिग्नल्सची शिस्त न पाळणे, झेब्रा क्रॉसिंगच्या पुढे आरामात जाऊन थांबणे यासारख्या छोट्या छोट्या बाबींकडेही यापुढे गांभीर्याने पाहणे काळाची गरज बनल्याचे दृष्टीपथास येते. हा झाला मुख्य रस्त्यावरील वाहतूक कोंडीचा भाग. शहराच्या अंतर्गत वाहतुकीलाही अनेक अडथळ्यांची शर्यत पार पाडावी लागते. गंज गोलाईत तसेच शहराच्या



अन्य भागातही अगदी रस्त्यावर, काही ठिकाणी रस्त्याच्या अगदी मधोमध आपले फळांचे, अन्य साहित्यांचे गाडे लावून विक्री करणाऱ्या विक्रेत्यांमुळेही अंतर्गत वाहतुकीची खूपदा कोंडी होताना दिसते. याबाबत उदाहरणादाखल सांगायचे झाल्यास लातूर शहरातील गांधी मार्केट भागातील भालचंद्र रक्तपेढीच्या कॉर्नरवर होणारी वाहतूक कोंडी.

याठिकाणी रस्त्यालगत काही हातगाडीवाले हक्काने रस्त्यावर आपला व्यवसाय करताना आढळतात. आपल्यामुळे वाहतुकीची प्रचंड कोंडी होतेय, हे पाहूनही ते जराही हलायला तयार नसल्याचे अनेकदा पाहायला मिळते. अशावेळी त्रस्त वाहनधारक त्यांच्याकडे रागाने ते बाजूला व्हावेत व वाहतुकीला रस्ता खुला करून द्यावा या आशेने बघतात. पण, तरीही हे हातगाडीवाले त्यांच्याकडे ढुंकूनही पाहताना दिसत नाहीत. हा प्रकार अतिक्रमणाचा असला तरी त्यांना त्याकरिता प्रोत्साहित कोण करते, तीच मंडळी त्यांना बाजूला हटवू शकतात. पण, ती मंडळी कोणालाही का जुमानत नाहीत? हे न सुटणारे कोडेच आहे. शहरातील प्रत्येक रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यात आले तर वाहतुकीची कोंडी पूर्णतः सुटण्यास मोलाची मदत मिळू शकणार आहे. ही बाब लोकप्रतिनिधी आणि प्रशासनातील अधिकाऱ्यांनाही चांगलीच माहिती आहे. पण कोणाचे ना कोणाचे हितसंबंध त्यात आड येतात, हे वास्तव आहे. नेपोलियन बोनापार्टने म्हटलेच आहे ना, जगात प्रयत्न केल्यास अशक्य काहीच नसते. अगदी तसेच लातूरच्या या वाहतूक व्यवस्थेचेही आहे. ही व्यवस्था सुरळीत होऊ शकते, फक्त आवश्यकता आहे ती अंतःकरणातून दूर करण्याची. फक्त त्या उपाय योजनांची सडेतोडपणे अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.

# बिल न भरल्यास वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई सुरू

## ■ १०६९ वीजग्राहकांचा वीजपुरवठा तात्पुरता खंडीत

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २५ नोव्हेंबर :** महावितरणने नोव्हेंबर महिन्याची व थकीत वीजबिलांची वसुली मोहीम



हाती घेतली असून गेल्या पंचेवीस दिवसात केवळ ६५ टक्केच वसुलीचे उदिष्ट साध्य करण्यात यश मिळाले आहे. उर्वरीत पाच दिवसात महावितरणला २० कोटी २ लाख रूपयांची थकबाकी वसुली करण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागणार आहे. त्यामुळे वीजग्राहकांनी आपल्या थकीत बीजबीलांचा भरणा करून सहकार्य करावे अन्यथा नाईलाजास्तव वीजपुरवठा खंडीत करण्याची कारवाई करावी लागेल असे आवाहन महावितरणने केले आहे.

महावितरणच्या लातूर मंडळासाठी वरिष्ठ कार्यालयाने लघूदाब वर्गवारीतील घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक ग्राहकांकडील वीजबील वसुलीसाठी नोव्हेंबर महिन्याचे चालू बिलाचे ५८ कोटी १८ लाख व थकबाकीचे १०१ कोटी ९३ लाख असे एकत्रीत १६० कोटी ११ लाख रूपयांचे लक्ष्य निर्धारीत केले आहे. या लक्ष्याचा पाठलाग करत मागील २५ दिवसात केवळ ३७ कोटी ९८ लाख रूपयांची वीजबील वसुली झालेली आहे. हे प्रमाण खूपच कमी असून येणाऱ्या पाच दिवसात उर्वरीत थकबाकी सोडून चालू महिण्याचे २० कोटी २ लाख रूपयांची वसुली होणे महावितरणसाठी तारेवरची कसरत ठरणार आहे. वसुलीसाठी मंडळातील सर्व अधिकारी, कर्मचारी दारोदार फीरत आहेत, मात्र जिल्हयातील घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक वर्गवारीतील वीजग्राहकांकडून फारसा सकारात्मक प्रतिसाद मिळताना दिसत नाही. त्यामुळे वीजपुरवठा खंडीत करण्याशिवाय महावितरणसमोर दुसरा पर्याय उरलेला नाही. वीजबील न भरल्यामुळे आजपर्यंत १०६९ वीजग्राहकांचा तात्पुरत्या स्वरूपात वीजपुरवठा खंडीत करण्यात आला आहे.

लातूर मंडळा अंतर्गत येणाऱ्या लातूर विभागातील लघुदाब वर्गवारीच्या वीजग्राहकांकडे नोव्हेंबर महिण्याची ३२ कोटी २८ लाख थकीत असून कालपर्यंत २२ कोटी ४ लाख रूपये वसुली झाली आहे. निलंगा विभागातील वीजग्राहकांकडे ९ कोटी ६४ लाख थकीत असून कालपर्यंत ५ कोटी ७८ लाख रूपये वसुली झाली आहे. तर उदगीर विभागातील वीजग्राहकांकडे १६ कोटी २६ लाख थकीत असून कालपर्यंत १० कोटी १६ लाख रूपये वसुली झाली आहे. वसुलीचे हे प्रमाण आत्तापर्यंतचे अत्यल्प प्रमाण आहे. थकबाकीदार वीजग्राहकांना एसएमएस द्वारे, प्रत्यक्ष फोन करून तसेच वीजकायद्यान्वये रीतसर नोटीस कालावधी उलटूनही गेला तरीही वीजग्राहक बील भरण्यास दिरंगाई करत असल्याचे दिसून येत आहे. वीजबील भरण्यासाठी महावितरणने विविध पर्याय उपलब्ध करून दिले आहेत. या सुविधांचा लाभ घेत वीजग्राहकांना घरबसल्याही बील भरता येणार आहे. त्यामुळे वीजग्राहकांनी त्वरीत वीजबीलाचा भरणा करावा असे आवाहन महावितरणने केले आहे.

# नागरिकांनी मतदार यादीतील नावाची पडताळणी करून घ्यावी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २५ नोव्हेंबर :** आगामी महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रशासनाच्या वतीने प्रारूप मतदारयादी जाहीर करण्यात आलेली आहे. या मतदार यादीमध्ये एका प्रभागातील मतदारांची नावे दुसऱ्या प्रभागात जोडल्या गेल्या असल्याच्या तक्रारी होत आहेत. याबाबत शहर जिल्हा भाजपच्या वतीने शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर व निवडणूक प्रमुख डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने मनपा आयुक्तांची भेट घेऊन मतदार यादींची दुरुस्ती करण्याचे निवेदन दिलेले आहे. शहरातील नागरिकांनी आपआपल्या मतदार यादीत आपल्या नावांची पडताळणी करून घ्यावी असे आवहान करून या प्रकरणी तक्रार असल्यास प्रशासनाची किंवा पक्ष पदाधिकारी व कार्यकर्त्याशी संपर्क साधावा असे आवहान करण्यात आले आहे.

आगामी महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रशासनाच्यावतीने प्रारूप



मतदार यादी जाहीर केलेली असून यामध्ये अनेक चुका झालेल्या असून वेगवेगळ्या प्रभागातील विविध मतदारांची नावे वेगळीकडे जोडली गेली आहेत. तसेच शहरा नजीक असलेल्या वेगवेगळ्या ग्रामपंचायत हद्दीतील मतदारांची नावे समाविष्ट झाली असल्याच्या तक्रारी येत आहेत. या मतदार यादीतील चुकांमुळे अनेक मतदार मतदानापासून वंचित राहण्याची शक्यता आहे. मतदार यादीचे वाचन केल्यानंतर शहर जिल्हा भाजपाच्या शिष्टमंडळाने शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर व निवडणूक प्रमुख डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांच्या नेतृत्वात मनपा आयुक्त मानसी मिना यांची भेट घेऊन चर्चा केली आहे. मतदार यादीतील या चुका दुरुस्त करण्याची मागणी निवेदनाच्या माध्यमातून करण्यात आलेली आहे. त्याचबरोबर याबाबतच्या हरकती लवकरच प्रशासनाकडे दाखल करण्यात येतील असे सांगितले आहे. मनपा प्रशासनाने निवेदनाची व हरकतींची दखल घेऊन मतदार यादी दुरुस्त करावी अशी भूमिका शहर जिल्हा भाजपने मांडली आहे. याबाबत आयुक्त मानसी मिना यांनी सकारात्मक प्रतिसाद देत हरकती नुसार

### शहर जिल्हा भाजपाच्या वतीने आवाहन

मतदार यादीमध्ये दुरुस्ती करण्यात येईल असे सांगून मतदानापासून कोणीही वंचित राहणार नाही असा विश्र्वास दिला.

मनपा प्रशासनाने मतदार यादी दुरुस्त करण्यात येईल असे सांगितले असले तरी शहरातील नागरिकांनी आपआपल्या मतदार यादीत आपल्या नावाची पडताळणी करून घ्यावी असे आवहान शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी लातूरकरांना केले आहे. मतदार यादीबाबत काही आक्षेप असल्यास तो प्रशासनाकडे दाखल करावा असे सांगून याबाबत शहर जिल्हा भाजपा पदाधिकारी किंवा कार्यकर्त्यांशी संपर्क साधावा असे आवहान केले आहे.

# शॉर्ट टर्म रिसर्च ग्रँट साठी डॉ. अंबुलगेकर, डॉ. गावडे यांची निवड

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २५ नोव्हेंबर :** येथील एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयातील एम.पी.टी.एच. प्रथम वर्षातील विद्यार्थीनी डॉ. ऋतुजा नागोराव अंबुलगेकर व डॉ. स्नेहल दिनकर गावडे यांची महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या शॉर्ट टर्म रिसर्च ग्रँट २०२४-२५ या संशोधन कार्यासाठी नुकतीच निवड झाली आहे. राज्यातील शासकीय व निमशासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांतून सदरील संशोधनासाठी ही निवड झाली आहे.

गेल्या एप्रिल २०२५ मध्ये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या वतीने शॉर्ट टर्म रिसर्च ग्रँट २०२४-२५ या संशोधन कार्यासाठी राज्यभरातील बी.पी.टी.एच. व एम.पी.टी.एच. फिजिओथेरपी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांकडून प्रस्ताव मागवले होते.

त्यामध्ये एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयातील २५ विद्यार्थ्यांनी संशोधन कार्यासाठी प्रस्ताव पाठवले होते. यामध्ये





२५ पैकी एम.पी.टी.एच. प्रथम वर्षातील विद्यार्थीनी डॉ. ऋतुजा अंबुलगेकर व डॉ. स्नेहल गावडे या विद्यार्थीनीच्या प्रस्तावाची निवड करण्यात आली आहे.

या निवडीबद्दल डॉ. ऋतुजा अंबुलगेकर व डॉ. स्नेहल गावडे यांचे एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड, प्राचार्य डॉ. सुभाष खत्री, मार्गदर्शक डॉ. रिशा कांबळे, डॉ. पराग नारायणकर, विभाग प्रमुख डॉ. गौरव भटनागर, डॉ. सिंगारा वेलन यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांतून अभिनंदन होत आहे.

# मुख औषधशास्त्र, क्ष-किरण शास्त्रातील राष्ट्रीय चरक पुरस्कार डॉ. कुलकर्णी यांना प्रदान



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २५ नोव्हेंबर :** भारतीय दंत संघटनेची मुख्य शाखा मुंबई यांच्या वतीने दंत चिकित्सा शास्त्रातील उत्कृष्ट कार्यासाठी दिला जाणारा राष्ट्रीय चरक पुरस्कार (शाखा: मुख औषधशास्त्र व क्ष - किरण शास्त्र) येथील एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील मुख औषधशास्त्र व क्ष - किरण शास्त्र विभागातील सहयोगी प्रा. डॉ. अभय कुलकर्णी यांना नुकताच प्रदान करण्यात आला.

भारतीय दंत संघटनेची मुख्य शाखा मुंबई यांच्या वतीने दंत शाखेतील वेगवेगळ्या विषयात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या दंत रोग तज्ज्ञांना राष्ट्रीय चरक पुरस्कार दिला जातो. सन २०२५ मधील या पुरस्कारासाठी देशभरातून नामांकन अर्ज प्राप्त झाले होते. त्यामध्ये मुख औषधशास्त्र व क्ष - किरण शास्त्र शाखेत डॉ. अभय

### चिलीचे कॉन्सुल जनरल गुस्तोवो गोंझालेझ यांच्या हस्ते डॉ. कुलकर्णी यांना पुरस्कार

कुलकर्णी यांनी केलेली रुग्ण सेवा, संशोधन, विविध पुस्तकांचे लेखन, कॉपी राईट व तंबाखु नियंत्रणासाठी केलेले भरीव कार्य लक्षात घेवून सलग दुसऱ्यांदा हा पुरस्कार त्यांना जाहिर झाला. मुंबई येथील जिओ कन्वेन्शन सेंटर येथे दि. ८ नोव्हेंबर रोजी पार पडलेल्या सोहळ्यात चिलीचे कॉन्सुल जनरल श्री गुस्तोवो गोंझालेझ यांच्या हस्ते हा पुरस्कार डॉ. अभय कुलकर्णी यांना प्रदान करण्यात आला. यावेळी मुख्य सचिव डॉ. अशोक ढोबळे, प्रभारी डॉ. दिपक माखीजानी हे उपस्थित होते.

डॉ. अभय कुलकर्णी हे गेल्या १२ वर्षापासून दंत शाखेतील मुख औषधशास्त्र व क्ष - किरण शास्त्र या विषयात कार्यरत आहेत. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या वतीने दिला जाणा 'अविष्कार २३' हा पुरस्कार त्यांना मिळाला आहे. त्यांची दंत आरोग्य विषयात सहा पुस्तके प्रसिध्द आहेत. दंत आरोग्य जागृतीसाठी मराठी, हिंदी, इंग्रजी, कन्नड या भाषेत ही पुस्तके प्रकाशीत केली आहेत. त्यांचे राज्यस्तरीय २०, राष्ट्रीय ६, आंतरराष्ट्रीय ३ नियतकालीकात शोधनिबंध प्रसिद्ध असून १७ कॉपीराईट आहेत. नाविन्यपूर्ण उपकरणे व संशोधनासाठी ते नेहमी प्रयत्नशील असून तंबाखु विरोधी मोहिमेसाठी सुध्दा ते सातत्याने कार्यरत आहेत. या यशाबद्दल डॉ. अभय कुलकर्णी यांचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड, प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे, उप प्राचार्य डॉ. यतिश कुमार जोशी, विभाग प्रमुख डॉ. विजयालक्ष्मी माले, डॉ. प्रियंका लासणे, डॉ. रोहिणी दिवेकर, डॉ. सायोज्यता बांगर यांच्यासह महाविद्यालयातील विविध विभागाचे प्रमुख शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.



बीड : गावरान बोर म्हटलं की जिभेला पाणी सुटते. सध्या झाडांना अशी बोरं लगडली आहेत(.छाया कृष्णा शिंदे)

# ‘निर्मळ’ कारभारासाठी भाजपला साथ द्या – ना. पंकजाताई मुंडेंनी धारूरच्या विकासाचे मांडले व्हिजन

**तभा वृत्तसेवा**
**धारूर दि.२४ नोव्हेंबर**

सुशासन आणि पारदर्शक कारभार हा भाजपचा मुलमंत्र आहे. समाजातील सर्व जाती धर्माच्या विकासाला प्राधान्य देऊन धारूरच्या ‘निर्मळ’ कारभारासाठी भारतीय जनता पक्षाला साथ द्या. तुमचा विश्वास सार्थ ठरवून धारूरला प्रगतीपथावर नेवून ठेवू. राज्याची मंत्री म्हणून नाहीतर धारूरची नगरसेवक बनून मी स्वतः शहराच्या विकासाकडे लक्ष देईल असा विश्वास राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज मतदारांशी बोलताना दिला. आजच्या या सभेने शहर कमळमय झाल्याचे दिसून आले.



धारूर नगर परिषद निवडणुकीतील भारतीय जनता पक्षाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार रामचंद्र अंबादासराव निर्मळ व नगरसेवक पदाच्या उमेदवाराच्या प्रचारानिमित्त आयोजित जाहीर सभेत ना. पंकजाताई मुंडे बोलत होत्या. माजी नगराध्यक्ष डॉ. स्वरूपसिंह हजारी, माधवराव निर्मळ, उदयसिंह दिख्खत, राम कुलकर्णी, संजय आंधळे, संदीप काचुगंडे यांच्यासह सर्व उमेदवार आणि पदाधिकारी उपस्थित व्यासपीठावर होते.

# गेवराईची जनताच इथली खरी मालक, तुमच्या विश्वासावरच शहराचा आणखी कायापालट करू

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२५ नोव्हेंबर**



गेल्या वीस वर्षांपासून मी गेवराई शहराच्या काळजीने लढत आलोय. अजूनही लढतोय, कारण तुम्ही माझ्या पायात बळ दिलं आहे. स्वप्न पाहायचं असेल तर त्यासाठी आहुती द्यावी लागते. जीवनाची आहुती दिल्याशिवाय गाव उभा राहत नाही. गेवराईची जनताच इथली खरी मालक आसून जनतेच्या विश्वासानेच शहराचा आणखी कायापालट करू असे प्रतिपादन भाजप नेते बाळराजे पवार यांनी केले.

गेवराई नगरपरिषद निवडणुकीत भाजपच्या नगराध्यक्षा पदाच्या उमेदवार सौ. गीताभाभी बाळराजे पवार व प्रभाग क्रमांक १, २, ३ मधील उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित कॉर्नर बैठकीत ते बोलत होते. यावेळी सौ. गिताभाभी, पवार ,भाजपाचे पि.टी.चव्हाण, श्रिकात सानप,या.अध्यक्ष सचिन दाभाडे, उध्दव रासकर, रत्नमाला मोटे,आदि दरम्यान मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता या बैठकीला सभेचे स्वरूप प्राप्त झाले होते.पुढे बोलताना ते म्हणाले, जगाला माहीत आहे की, मी जेलमध्ये होतो. पण गेवराईच्या हितासाठी जे काही करावं लागलं, ते केलं. सहा महिने महाराष्ट्रातील विविध नगरपरिषदा पाहत फिरलो. अपक्ष असताना पैसे नव्हते, तरीही घंटा गाडी सुरू करून शहराला कचरा मुक्त करण्यासाठी काम केलं. दिवसभर सफाईसाठी धडपड केली. माझं संपूर्ण आयुष्य गेवराई शहराला अर्पण केलं आहे. नगरपरिषदेच्या आर्थिक स्थितीचा उल्लेख करत पवार म्हणाले, दर महिन्याला दहा लाख रुपये वीज बील आणि वर्षाला नऊ कोटी रुपयांची जबाबदारी असणारी गेवराई नगरपरिषद चालवताना आम्ही एक रुपयाचाही गैरव्यवहार केला नाही. हे सारे पैसे आम्ही खाल्ले असते, तर शहराची अवस्था वेगळी दिसली असती.पैठण प्रकल्पाबद्दल बोलताना त्यांनी विरोधकांवर टीका करत सांगितले, पैठणहून पाणी आणू म्हणलं तेव्हा विरोधक हसायचे. पण ते काम आम्ही करून दाखवलं. आज रोज पाणी देता येईल, काही अडचण नाही. पण पाण्याचा अपव्यय होईल हे सुद्धा काही लोकांना कळत नाही.

# परळीच्या जनतेची सेवा आणि विकास हाच आपला ध्यास – पद्मश्रीताई धर्माधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२५ नोव्हेंबर**

परळीच्या मातीतील जनतेची सेवा आणि विकास हाच आपला ध्यास आहे. मागील अनेक वर्ष आ.धनंजय मुंडे यांच्या खंबीर नेतृत्वात आम्ही काम करत आलो आहोत.त्यामुळेच परळीकर सुज्ञ जनता महायुतीच्या नगराध्यक्ष पदासह सर्व उमेदवारांच्या पाठीशी मतदान रुपी आशीर्वाद उभा करून भरघोस मतांनी आम्हास विजयी करून देईल असा विश्वास नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी व्यक्त केला आहे.

परळी वैजनाथ नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी आणि महायुतीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ.पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांच्या उपस्थितीत परळीतील विविध प्रभागांमध्ये प्रचार रॅलीला प्रचंड जन समर्थन मिळत असल्याचे दिसून येत आहे. त्याचप्रमाणे महायुतीच्या प्रचारार्थ आयोजित विविध प्रभागाच्या बैठकांनाही नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद मिळत असून अक्षरशः बैठकीला एखाद्या जाहीर सभेचे रुप मिळत असल्याचे दिसत आहे. यावेळी विविध ठिकाणी उपस्थित जनसमुदायाला संवाद साधताना पद्मश्रीताई धर्माधिकारी आपल्या विकासाचा नवाज दृष्टिकोन प्रयोग ठेवत असून त्यांच्या या विकासात्मक मांडणीला तमाम परळीकरांमधून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे.



प्रचारदौऱ्यात त्यांनी विविध ठिकाणी बोलताना सांगितले की,जनतेच्या आशा-अपेक्षा आणि चौफेर विकासाचे स्वप्न साकार करण्यासाठी 'चौफेर व सर्वंकष विकासाचा घेऊन वसा -वैद्यनाथाच्या परळीचा जपुया वारसा' हा संकल्प घेऊन मी परळीकर जनता जनार्दनासमोर आशिर्वाद मागत आहेत. नगराध्यक्षा म्हणून येणाऱ्या काळात परळीच्या विकासात्मक वाटचालीत चौफेर व सर्वंकष नवी अश्वासक दिशा देण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. त्यांच्या उमेदवारीचे परळीकरांनी उत्स्फूर्त स्वागत केले असुन संपूर्ण शहरातून सर्व स्तरातून त्यांना प्रचंड पाठिंबा मिळत आहे.

## बंधुत्व , समता आणि स्वातंत्र्याचा पवित्र ग्रंथ – डॉ.बाबासाहेबांच्या शाईतून जन्मलेलं मुक्त भारताच भविष्य : भारतीय संविधान

२६ नोव्हेंबर हा दिवस भारतासाठी अत्यंत ऐतिहासिक आहे . १९४९ मध्ये आजच्याच दिवशी भारताचे संविधान स्वीकारले गेले आणि म्हणून हा दिवस ‘ संविधान दिन ’ म्हणून साजरा केला जातो . स्वातंत्र्यानंतर राष्ट्र उभे करताना एक बळकट चौकट , समतेचा आधार , न्यायाची हमी आणि स्वातंत्र्याचा श्वास देणारे दस्तऐवज म्हणून संविधानाने भारताला मार्गदर्शन दिले . डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील मसूदा समितीने २ वर्षे ११ महिने १८ दिवस मेहनत करून तयार केलेले हे संविधान आज जगातील सर्वात मोठे , सर्वसमावेशक आणि प्रगत संविधान मानले जाते . संविधान दिन हा फक्त एक औपचारिक दिवस नाही , तर लोकशाहीचे तत्त्व , कर्तव्य आणि नागरिकत्वाची जाणीव जागृत करणारा दिवस आहे . या दिवशी केंद्र शासन आणि राज्य शासनामार्फत संविधान वाचन , प्रस्तावना पठण , लोकशाही जनजागृती , शैक्षणिक स्पर्धा , न्याय – विधी विषयक परिसंवाद , शासकीय कार्यालयांमधील साक्षर संविधान कार्यक्रम आणि कानूनी जागरुकता अभियान यांसारखे उपक्रम देशभर राबवले जातात . अनेक जिल्हा प्रशासनांकडून शालेय मुलांसाठी संविधान प्रश्नमंजुषा , जनप्रतिनिधींसाठी विशेष कार्यशाळा , तसेच संविधान सप्ताह साजरा करण्याची परंपराही वाढत आहे . म्हणूनच म्हणतात : संविधान वाचलं की राष्ट्र जागतं , संविधान पाळलं की राष्ट्र बळकट होतं .

# बहादुरभाई सर्व धर्मीयांना सोबत घेऊन काम करणारे नेतृत्व त्यामुळे नगराध्यक्षाची संधी मैनुमा बेगम यांनाच द्या – मिलिंद घाडग

## प्रभाग क्रमांक १२ मध्ये कांग्रेस,वंचितची प्रचार फेरी

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२५ नोव्हेंबर**

काँग्रेसचे परळी शहर अध्यक्ष बहादूर भाई हे सर्व धर्मियांना सोबत घेऊन काम करणारे नेतृत्व आहेत.त्यामुळे परळी नगर परिषद निवडणुकीत नगराध्यक्ष पदाच्या कांग्रेस, वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवार मैनुमा बेगम सय्यद हनीफ उर्फ बहादूर भाई यानांच प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे यांनी केले.ते प्रभाग क्रमांक १२ मध्ये नगराध्यक्षांच्या प्रचारासाठी काढण्यात आलेल्या प्रचार फेरीत बोलत होते.

वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा सचिव एडवोकेट संजय रोडे व युवा नेते सय्यद समीर यांच्या उपस्थितीत प्रभाग क्रमांक १२ मध्ये दिनांक २५ रोजी सकाळी भव्य प्रचार फेरी काढण्यात आली.विद्यानगर, कंडक्टर कालनी, सोमेश्वर नगर,नाथ नगर, शास्त्री नगर, गजानन महाराज मंदिर परिसर,इरिगेशन कालनी आदी भागातील मतदारांशी यावेळी संवाद साधला व कांग्रेस, वंचित बहुजन आघाडीला विजयी करण्याचे आवाहन केले.

या प्रचार फेरीत कांग्रेस राज्य कार्यकारिणी सदस्य एडव्होकेट अनिल मुंडे, तालुकाध्यक्ष अडवोकेट प्रकाश मुंडे, जेष्ठ नेते प्रकाश देशमुख, सुभाष देशमुख, वंचितचे नेते प्रसेनजित रोडे, वंचित युवा तालुका अध्यक्ष राजेश सरवदे,वैजनाथ गडेकर, ख्वाजा शेख, महेश वाकडे, ऋषी लोमटे, इतेशाम खतीब आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# काँग्रेस वंचित बहुजन आघाडीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार मैनुमा बेगम सय्यद हनीफ यांच्या प्रचार फेरीस प्रभाग क्रमांक १ व २ मध्ये प्रचंड प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२५ नोव्हेंबर**

परळी नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ काँग्रेस ,वंचित बहुजन आघाडीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार मैनुमा बेगम सय्यद हनीफ उर्फ बहादूर भाई तसेच प्रभाग क्रमांक १ व २ मधील काँग्रेसचे उमेदवार गुलाब पठाण तसेच सय्यद हनीफ उर्फ बहादूर भाई यांच्या प्रचारार्थ आज भव्य प्रचार फेरी काढण्यात आली. या प्रचार फेरीस मतदारांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला असून काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारालाच मतदान करण्याचे वचन मतदारांनी यावेळी दिले.



आज दिनांक २४ नोव्हेंबर रोजी सकाळी प्रभाग क्रमांक १ व २ या प्रभागातील काँग्रेस ,वंचित बहुजन आघाडीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार तसेच नगरसेवक पदाचे उमेदवार यांच्या प्रचारासाठी भव्य प्रचार फेरी काढण्यात आली. यावेळी नगराध्यक्ष पदाचे उमेदवार मैनुमा बेगम सय्यद हनीफ उर्फ बहादूर भाई, प्रभाग क्रमांक एक मधील काँग्रेसचे अधिकृत उमेदवार गुलाब पठाण यांनी मतदारांच्या गाठीभेटी घेऊन मताचा आशीर्वाद मागितला व काँग्रेस वंचित बहुजन आघाडीला विजय करण्याचे आवाहन केले.

या प्रचार फेरीत इस्माईल पठाण ,इब्राहिम शेख ,सय्यद शेख ,अफजल पठाण, सोहेल शेख, शेख खलील,सय्यद इब्राहिम, इब्राहिम चाऊस, रशीद पठाण, खालीद बागवान, आयेशाबी, शेरबानो, सुषमाताई यांच्यासह पुरुष महिला कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# नाथापूर पिंपळनेर रोडवर पहाटे धडक कारवाई – अवैध वाळू वाहतूक करणारा टेम्पो जप्त – बीडच्या महसूल विभागाची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२५ नोव्हेंबर**



नाथापूर पिंपळनेर रोडवरील खंडेश्वरी मंदिरजवळ , पॉलिटेक्निक कॉलेज परिसरात महसूल विभागाने २५ नोव्हेंबर रोजी पहाटे २ वाजता गुप्त माहितीच्या आधारे राबविलेल्या धडक कारवाईत अवैध वाळू वाहतूक करणारा टेम्पो जप्त केला . तांबड्या रंगाचा टेम्पो क्रमांक चक१६ –ध ८५१२ यामध्ये अंदाजे १ ब्रास वाळू आढळून आली . चालकाकडे वाहतूक परवाना विचारणा केली असता कोणताही वैध परवाना नसल्याचे स्पष्ट झाले . वाहन मालकाचे नाव आरबाज बेग रईस बेग रा . खासबाग , ता . जि . बीड असल्याचे चालकाने सांगितले .

महसूल प्रशासनाला काही दिवसांपासून सिंधफणा नदीकाठी कुर्ला , कुक्कडगाव , भाटसांगवी परिसरात बेकायदेशीर वाळू उपसा सुरू असल्याच्या तक्रारी मिळत होत्या . त्यानुसार पथकाने रात्री उशिरापर्यंत गुप्त पाळत ठेवली . संशयित वाहनाने वेगाने पलायनाचा प्रयत्न करताच पथकाने निर्धाराने ५ किलोमीटरपर्यंत पाठलाग केला . अखेर नाथापूर पिंपळनेर रोडवर सापळा रचून वाहनाला वेढा देत पकडण्यात यश आले . अचानक तपासणीमध्ये कोणतीही परवानगी किंवा परवाना नसताना वाळूची वाहतूक होत असल्याचे उघड झाले .

पथकाने वाहन व वाळू जप्त करून पुढील कार्यवाहीसाठी ते तहसील कार्यालय बीड येथे लावण्यात आले . महाराष्ट्र जमीन महसूल कायदा व वाळू नियमांनुसार दंडात्मक व कायदेशीर कारवाई सुरू आहे.

या कारवाईमुळे परिसरातील वाळू माफियांना स्पष्ट इशारा गेला आहे . नैसर्गिक संसाधनांची लूट , नदीपात्र धूप , शेतीचे नुकसान , पाणीपुरवठ्यावर परिणाम आणि शासन महसुलाला फटका अशी गंभीर परिस्थिती निर्माण करणाऱ्या अवैध उत्खननावर आळा बसणार असल्याची प्रतिक्रिया स्थानिकांनी दिली .

बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आवाहन केले की कोणीही बेकायदेशीर वाळू उत्खनन , वाहतूक अथवा विक्री करू नये . प्रशासनाकडे माहिती असल्यास त्वरित कळवावी . वाळू माफियांना कुठलाही पाठीशी घालण्यात येणार नाही .

अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी नागरिकांना सहकार्याचे आवाहन करत सांगितले की अवैध उत्खननामुळे जलस्रोत आणि पर्यावरण धोक्यात येते . कायद्याचे पालन करणे ही सर्वांची जबाबदारी आहे . उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी इशारा देत म्हटले की सिंधफणा परिसरात तपास मोहिमा सुरू राहतील . कुणीही गैरप्रकारात सामील असल्यास कठोर कारवाई टाळता येणार नाही .

बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी नमूद केले की अशा प्रकारच्या कारवाया सातत्याने राबविल्या जाणार आहेत . कोणीही अवैध रित्या वाळूची वाहतूक करू नये , कायद्याचे पालन करावे , संशयास्पद हालचाली दिसल्यास महसूल विभागास कळवावे .

ही कारवाई जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , उपविभागीय अधिकारी कविता जाधव , तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या आदेशानुसार नायब तहसीलदार प्रशांत जाधवर , ग्राम महसूल अधिकारी दादा शेळके , विकास ससाणे , विजय बहीर , विलास शिंदे , खांडेकर एम . व्ही . , यशवंत सानप यांच्या पथकाने केली .बीड जिल्हा प्रशासन सज्ज असून अशा धाडसी कारवाया पुढेही सुरू राहणार आहेत, असे जिल्हा गौण खनिज अधिकारी नरेंद्र कुलकर्णी यांनी सांगितले .

# हा लोकशाहीचा विजय आणि दडपशाहीचा बिमोड करण्याची सुरुवात आहे – सौ.संध्या दिपक देशमुख

## दीपक देशमुख यांच्या संघर्षाला यश!

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२५ नोव्हेंबर**

परळी नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम सुरू असताना, अर्जाच्या छाननी दरम्यान, प्रभाग क्रमांक ९ चे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार संपत हजारे यांच्या उमेदवारी अर्जावर आक्षेप घेण्यात आला होता.अर्जाच्या छाननी वेळी परळी नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी या आक्षेपास ग्राह्य धरून,प्रभाग क्रमांक ९ चे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार संपत हजारे यांचा अर्ज नामंजूर करण्यात आला होता.यास राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाकडून जिल्हा सत्र न्यायालयात धाव घेण्यात आली. जिल्हा न्यायालयाच्या निकालानंतर न्यायालयाकडून हा अर्ज मंजूर करण्यात आला आहे. तसेच,प्रभाग क्रमांक ९ चे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार संपत हजारे यांचा सत्र न्यायालयाकडून अर्ज मंजूर होऊन त्यांची निशाणी तुतारी वाजवणारा माणूस मिळाली आहे.त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाने न्यायालयीन लढाई जिंकली आहे.



जिल्हा सत्र न्यायालयाच्या निकालाचा आम्ही सन्मान करतो , मात्र, आम्हाला संविधानिक न्याय मिळविण्यासाठी न्यायालयाचे दार ठोठावे लागते.यावरून , निवडणूक निर्णय अधिकारी हे पक्षपाती आहेत हे सिद्ध होते.म्हणजे दडपशाही करून दडपण्याचा प्रयत्न लोकशाहीत टिकत नाही.हे अनेकांना कळले असेल तर परळीतील निवडणूक निर्णय अधिकारी पक्षपाती आहेत हे या निकालाने सिध्द झाले आहे.सत्यमेव जयते!

सौ.संध्या दिपक देशमुख
(राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार)

ही सगळी न्यायालयीन प्रक्रिया पक्षाचे नेते ड.माधव जाधव यांनी पूर्ण केली व कायदेशीररित्या त्यांनी बाजू मांडून विजय मिळवून दिला. त्याबद्दल त्याचं ऋण व्यक्त करतो.

दिपक रंगनाथ देशमुख
(राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे नगरसेवक पदाचे उमेदवार)

# लोक विकास महाआघाडीच्या विजयावर शिक्कामोर्तब करणारी उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांची रेकॉर्ड ब्रेक सभा

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२५ नोव्हेंबर**

अंबाजोगाई नगरपरिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट), राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार), समाजवादी पार्टी, रिपाइं आठवले गट, मनसे तसेच विविध मित्र पक्ष आणि संघटना पुरस्कृत लोक विकास महाआघाडीच्या नगराध्यक्ष तसेच शहरातील १५ प्रभागातील ३१ उमेदवारांच्या प्रचारार्थ सोमवार, दि.२४ नोव्हेंबर रोजी राज्याचे अर्थमंत्री, उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजितदादा पवार यांची जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. ही सभा रेकॉर्ड ब्रेक झाली. सभेसाठी सर्वधर्मीय जनसमुदायाची प्रचंड संख्येने उपस्थिती होती.



अत्यंत सुंदर व दिमाखदार नियोजनामुळे हि सभा लोक विकास महाआघाडीच्या विजयावर शिक्कामोर्तब करणारी ठरली आहे.

यावेळी व्यासपीठावर प्रमुख मार्गदर्शक म्हणून राज्याचे अर्थमंत्री, उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजितदादा पवार तर सभेच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ संपादक प्रा.नानासाहेब गाठाळ हे होते, तसेच व्यासपीठावर लोक विकास महाआघाडीच्या नगराध्यक्षपदाचे उमेदवार राजकिशोर मोदी तसेच शहरातील १५ प्रभागातील ३१ उमेदवार यांच्यासह रमेशराव आडसकर, माजी आमदार पृथ्वीराज साठे, जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर चव्हाण, राजेसाहेब देशमुख, डॉ.नरेंद्र काळे, बबनराव लोमटे, दत्तात्रय पाटील, कल्याण आखाडे, तालुकाध्यक्ष राजाभाऊ औताडे, रिपाइंचे महेंद्र निकाळजे, समाजवादी पार्टीचे ॲड.शिवाजी कांबळे, मनसेचे सुनील जगताप, तालुकाध्यक्ष अमरराव देशमुख, शेख मुख्तार, दिनकर जोशी, डॉ.राजेश इंगोले, लोक विकास महाआघाडीचे अध्यक्ष ॲड.अनिल लोमटे, विशाल जाजू, राजपाल लोमटे, ॲड.विष्णुपंत सोळंके, गोविंद देशमुख, ॲड.दयानंद लोंढाळ, सुनील वाघाळकर, सतिशराव लोमटे, संजिवनीताई देशमुख, अमृताताई काळदाते, बालासाहेब शेप, अशोक पालके, रशीदभाई, अंकुश ढोबळे, राजवर्धन दौंड, प्रवीण जायभाय तसेच नगरसेवकपदाचे उमेदवार इस्माईल हिरू गवळी, मनोज लखेरा, दिनेश भराडीया, जयश्री पृथ्वीराज साठे, राजश्री अशोक मोदी यांची प्रमुख उपस्थिती होती.

# जिल्ह्यातील तीनही नगर पालिका निवडणुकीत भाजपचा एकला चलो नारा, महाविकास आघाडी अभेद्य

## वसमतमध्ये शिवसेना-राष्ट्रवादी एकत्र, कळमनुरीत भाजप, शिंदेसेना, महाविकास आघाडीत लढत होणार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ नोव्हेंबर**

जिल्ह्यातील हिंगोली, वसमत आणि कळमनुरी नगर पालिका निवडणुकांच्या प्रचाराला आजपासून सुरूवात झाली असून महायुतीतील घटन पक्षांनी भाजपला दुर सारल्यामुळे भाजपने तीनही नगर पालिका निवडणुकीत नगराध्यक्षपदासाठी उमेदवार देत स्वतंत्र निवडणुका लढविण्यासाठी कंबर कसली आहे. हिंगोलीत शिवसेना शिंदे गट आणि भाजपने स्वतंत्रपाणे नगराध्यक्षपदाचा उमेदवार आणि नगर सेवक पदाचे उमेदवार उभे केले आहे. राष्ट्रवादीनेही याठिकाणी स्वतंत्र निवडणुक लढवित असून महाविकास आघाडीमध्ये मात्र एकत्रितपणे नगराध्यक्षपदासाठी उमेदवार व नगरसेवक पदाचे उमेदवार उभे केले आहेत. हिंगोलीत तिरंगी लढत होणार आहे. वसमतमध्ये राष्ट्रवादी आणि शिवसेना यांच्यात युती झाली आहे. याठिकाणी भाजपला सोडचिठ्ठी दिल्यामुळे भाजपने स्वतंत्र नगराध्यक्षपदासाठी आणि नगरसेवक पदासाठी उमेदवार उभे केले आहेत. येथे अपक्ष उमेदवार सविता क्यातमवार यादेखील निवडणुक रिंगणात असल्यामुळे निवडणुक रिंगणात आहेत तर महाविकास आघाडीकडून काँग्रेसच्या सीमा अब्दुल हाफीस या नगराध्यक्षपदासाठी निवडणुक रिंगणात आहेत. याठिकाणी चौरंगी लढत होणार असल्याचे चित्र दिसत आहे. कळमनुरीत शिवसेनेच्या नगराध्यक्षपदासाठी उमेदवार तसेच नगरसेवक पदासाठी उमेदवार उभे करण्यात आले आहेत तर भाजपनेही कळमनुरी आपली ताकद दाखविण्यासाठी नगराध्यपदासह उमेदवार उभे केले आहेत. याठिकाणीही महाविकास आघाडीने एकत्रित उमेदवार दिला आहे.

हिंगोली नगर पालिका निवडणुकीत भाजपच्या सौ नीता बाबाराव बांगर, शिवसेना शिंदे गटाच्या रेखा श्रीराम बांगर आणि महाविकास आघाडीच्या अर्चना श्रीराम भिसे यांच्यात तिरंगी लढत होणार असल्याचे चित्र दिसत आहे. ही निवडणुक भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे आणि कळमनुरीचे आ. संतोष बांगर यांनी प्रतिष्ठेची केली आहे. तर महाविकास आघाडीचे सहसंपर्क प्रमुख विनायक भिसे यांनीही काँग्रेस, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाला सोबत घेत निवडणुकीत मुसंडी मारल्याचे दिसत आहे.

हिंगोली नगर पालिकेत माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर यांच्या काळात हिंगोली शहराचा विकास झाला. अनेक विकास कामे केली आहेत. शिवाय आ. मुटकुळे यांनी कोट्यावधी निधी आणून जलेश्वर तलावाचे सौदर्यीकरण केले आहे. तसेच ८६ कोटीचा निधी नवीन पाणीपुरवठा योजनेसाठी मंजूर करून आणला असून या निधीतून शहराचा पाणीप्रश्न सुटणार आहे. त्यामुळे निवडणुकीत विकास कामांच्या जोरावर भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर यांचा जोरदार प्रचार सुरू आहे. भाजपने घरोघरी भेटी देऊन संवाद साधण्यास सुरूवात केली आहे परंतु भाजपचे पाच नगरसेवक पदाचे उमेदवारांनी निवडणुकीतून माघार घेतल्यामुळे भाजपला मोठा धक्का बसला आहे. याचे चिंतनही भाजपला करावे लागणार आहे. या निवडणुकीत भाजप शिंदेसेनेला अवैध धंद्यावरून लक्ष्य करीत असल्याचे दिसत आहे.

दुसरीकडे शिवसेना शिंदे गटाचे आ. संतोष बांगर यांनी त्यांचे बंधू माजी सभापती श्रीराम बांगर यांच्या पत्नी रेखा श्रीराम बांगर यांना नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत उभे केले आहे. आ. बांगर यांनी सुरूवातीपासूनच आक्रमक प्रचार केला असून भाजपला खिंडार पाडत काही पदाधिकाऱ्याचा पक्षप्रवेश करून घेतला तसेच काही उमेदवारांना ऐन निवडणुक काळात उमेदवारी माघारी घेण्यास भाग पाडल्यामुळे निवडणुकीत अधिकच रंगत निर्माण झाली आहे. त्यातच काँग्रेसचे माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर यांनी शिवसेनेत प्रवेश केल्यामुळे त्यांच्या समर्थकांमुळे शिवसेनेला बळ मिळाले आहे.

महाविकास आघाडीकडून उबाठाचे शिवसेनेचे सहसंपर्क प्रमुख विनायक भिसे यांच्या भगिनी अर्चना श्रीराम भिसे यांनी नगराध्यक्षपदासाठी उमेदवारी मिळाली आहे. खा नागेश पाटील आष्टीकर, माजी आ. डॉ संतोष टारफे, जिल्हाप्रमुख गोपू पाटील, संदेश देशमुख, उपजिल्हाप्रमुख परमेश्वर मांडगे यांच्यावतीने जोरदार निवडणुकीचा प्रचार करण्यात येत आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शदरचंद्र पवार गटानेही उबाठाच्या उमेदवार अर्चना भिसे यांचा प्रचार सुरू केला आहे. महायुतीच्या मतदारांमध्ये फूट पडल्यास महाविकास आघाडीला त्याचा फायदा मिळू शकतो.

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून अमीनाबी प्यारेवाले यांना नगराध्यक्षपदासाठी निवडणुक रिंगणात उतरवले असले तरी अद्याप त्या शर्यतीत कुठेही दिसत नसल्याचे चित्र दिसत आहे.

वसमतमध्ये राष्ट्रवादीचे आ. राजू नवघरे आणि आ. संतोष बांगर यांनी युती करत भाजपला दूर ठेवले आहे. त्यामुळे याठिकाणी भाजपने माजी नगराध्यक्ष शिवदास बोड्डेवार यांच्या पत्नी सुषमा शिवदास बोड्डेवार या नगराध्यक्षपदासाठी निवडणुक रिंगणात आहेत. राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या सुनीता मनमोहन बाहेती तर महाविकास आघाडीकडून काँग्रेसच्या सीमा अब्दुल हाफीस या नगराध्यक्षपदासाठी निवडणुक रिगणात आहेत. अपक्ष म्हणून सविता क्यातमवार या निवडणुक रिंगणात आहेत. आ. राजू नवघरे आणि आ. संतोष बांगर यांनी भाजपला दूर सारीत युती केली आहे. मात्र शिवसेनेचे माजी मंत्री डॉ जयप्रकाश मुंदडा यांनी अपक्ष उमेदवार सविता क्यातमवार यांना पाठींबा दिला आहे. त्यामुळे याठिकाणी राजकीय समीकरण बदलणार असल्याचे दिसत आहे. महायुतीमध्ये भाजप नसल्यामुळे मतांचे विभाजन महाविकास आघाडीच्या पथ्यावर पडणार आहे. महाविकास आघाडीच्या सीमा अब्दुल हाफीस यांनी प्रचारात चांगलीच रंगत आणल असून वसमतमध्ये चौरंगी लढत होण्याचे संकेत मिळत आहेत.

कळमनुरी नगरपालिका निवडणुकीत शिवसेना शिंदेगटाचे आ. संतोष बांगर यांच्या नेतृत्वात आश्लेषा वैभव चौधरी हा नवीन चेहरा नगराध्यक्षपदासाठी निवडणुक रिंगणात आहे. तर भाजपचे जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, भाजपचे नेते संजय कावडे यांच्या पत्नी वैशाली संजय कावडे नगराध्यक्षपदासाठी निवडणुक रिंगणात उतरल्या आहेत. महाविकास आघाडीच्यावतीने काँग्रेसच्या कुरेशी कौसर बेगम यांना नगराध्यक्षपदाची उमेदवारी मिळाली आहे. कळमनुरीतही भाजप आणि शिवसेना आमनेसामने असून विकास कामांवरून एकमेकांवर आरोप प्रत्यारोप होत आहेत. याठिकाणीही महायुतीच्या मतांचे विभाजन झाल्यास महाविकास आघाडीला त्याचा फायदा होण्याची दाट शक्यता आहे. कळमनुरीत तिरंगी लढत होण्याची दाट शक्यता आहे.

जिल्ह्यात महायुतीमध्ये एकमत झाले नाही त्यामुळे महायुतीतील पक्ष एकमेकांसमोर उभे आहेत. महाविकास आघाडीला याचा कितपत फायदा मिळतो हे निकालानंतरच स्पष्ट होणार आहे.

[redacted]




हिंगोली- नगर पालिका निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाच्यावतीने निवडणुक प्रचार रथाला हिरवी झेंडी दाखवताना माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, आ. तान्हाजीराव मुटकुळे, माजी जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, पवन उपाध्याय यांच्यासह पदाधिकारी दिसत आहेत. छाया- विजय गुंडेकर

## संक्षिप्त वृत्त

### वसमतमध्ये न्यायालयानेही ठरवला अजगर पटेल यांचा उमेदवारी अर्ज बाद

वसमत- नगरपरिषद निवडणुकीत काँग्रेस (आय)चा दावा करत प्रभाग क्रमांक सहा ब वसमत येथे मैदानात उतरलेले अजगर पटेल यांना सलग दोन मंचांवर जबर धक्का बसला आहे. निवडणूक निर्वाचन अधिकाऱ्यांनी नामनिर्देशन रद्द केल्यानंतर, आज दि. २५ नोव्हेंबर रोजी वसमत जिल्हा व सत्र न्यायालयानेही पटेल यांनी दाखल केलेली अपील फेटाळत निवडणूक निर्वाचन अधिकारी यांचा निर्णय कायम ठेवला. अजगर पटेल यांनी दाखल केलेल्या अपील अर्जावर आज सत्र न्यायालयात सुनावणी झाली. शेख हबीब यांच्या वतीने ॲड फैसल आलम यांनी न्यायालयात बाजू मांडली व चौथ्या अपत्याच्या नियमभंगाचा मुद्दा ठामपणे न्यायालयापुढे ठेवला उत्तरार्थी उमेदवार शेख हबीब यांच्या बाजूचा युक्तिवाद कायदेशीरदृष्ट्या अधिक मजबूत असल्याचे स्पष्ट करत प्राथमिक सुनावणीपासूनच पटेल यांची बाजू कमकुवत असल्याचे ॲड फैसल आलम यांनी न्यायालयात सांगितले निवडणूक निर्वाचन अधिकाऱ्यांकडे झालेल्या सुनावणीत आक्षेपकर्त्याच्या बाजूने उभे राहिलेले ॲड. फैसल आलम यांनी नियमभंग झाला तर उमेदवारी टिकत नाही हा कडवा मुद्दा इतका नेमका रोवला की प्रतिस्पर्धी पक्षाकडे प्रतिवाद उरला नव्हता. तोच निष्कर्ष सत्र न्यायालयानेही मान्य केला.न्यायालयाने स्पष्ट केले की २००१ नंतरच्या चौथ्या अपत्याचा नियम सर्वांसाठी समान आहे; नियमभंग केल्यास उमेदवारी ग्राह्य धरता येत नाही. विद्यमान न्यायालयाच्या आदेशानंतर अजगर पटेल यांच्या सर्व दाव्यांवर पूर्णविराम मिळाला आहे.

### सर्वच समाजाला सोबत घेवून काम केले- बाबाराव बांगर



हिंगोली- हिंगोली नगर पालिकेवर मी नगराध्यक्षपदावर असतांना सर्वच समाजासाठी काम केले आहे. ब्राम्हण, मराठा, माहेश्वरी, मारवाडी, बौध्द, वंजारी आदी समाजाला शहरात मोकळी जागा देऊन त्याठिकाणी सभागृह बांधण्यासाठी प्रत्येकी एक कोटीचा निधी दिला आहे. २०१६ ते २०२१ या कालावधीत हिंगोली शहराच्या विकासासाठी तब्बल ५०० कोटींचा निधी आणला. त्यातून शहरात रस्ते, सभागृह आदी विकास कामे केली आहेत. शहरातील प्रत्येक नागरिकांची कामे नगर पालिकेच्या माध्यमातून केली आहेत असे प्रतिपादन माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर यांनी केले. यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विभागीय बॉल बॅडमिंटन स्पर्धेत लाल बहादुर शास्त्री विद्यालयाचे यश

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, २५ नोव्हेंबर**




येथील लाल बहादूर शास्त्री विद्यालयाने विभागीय शालेय बॉलबॅडमिंटन स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करून १७ वर्षे मुली व १७ वर्षे मुले या दोन्ही गटांत प्रथम क्रमांक मिळवण्याचा पराक्रम साधला.

मुलींच्या गटातील अंतिम सामन्यात विद्यालयाच्या संघाने बीडच्या संघावर मात करून विभागीय विजेतेपद पटकावले. विजयी मुलींच्या संघात ईश्वरी राऊत, वैष्णवी व्यवहारे, सई सवंडकर, वेदिका अंभोरे, आरुशी अंभोरे, श्रेया जाधव, राशी कोल्हे, वेदिका गिरी, अनन्या गट्टानी आणि मयुरी बेंडे यांचा समावेश होता. उत्कृष्ट समन्वय, अचूक सर्व्हिस आणि एकसंघ खेळामुळे मुलींच्या संघाने संपूर्ण स्पर्धेत प्रभाव टाकला.

मुलांच्या गटातही विद्यालयाच्या संघाने दमदार खेळ करत जालना संघाचा पराभव करून विजेतेपद मिळवले. या विजयी संघात आदित्य गावंडे, पार्थ सईम, प्रचित डोंगरे, रजत अन्वेकर, सिद्धांश शिराळे, कौस्तुभ डोंगरकडेकर, नितेश कांचनगिरे, रुद्र लोंढे, मन्मथ राऊत आणि श्रेयस अंभुरे या खेळाडूंचा समावेश होता.या दुहेरी विजयाबद्दल शाळेचे अध्यक्ष संदीप चव्हाण, दोन्ही माध्यमाचे प्राचार्य, समन्वयक तसेच क्रीडा शिक्षक उबारे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## शेतकऱ्यांचा डिजीटल मित्र महाविस्तार एआय

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ नोव्हेंबर**

राज्य शासनाच्या कृषी विभागाच्या अंतर्गत शेतकऱ्यांसाठी महाविस्तार एआय हे अत्याधुनिक ॲप विकसित करण्यात आले आहे. हे कृत्रिम बुद्धीमत्ता (एआय) आधारित ॲप शेतकऱ्यांसाठी सर्वोत्कृष्ट डिजिटल सहाय्यक ठरत आहे. शेती संबंधित सर्व माहिती एका ठिकाणी उपलब्ध करुन देण्याचे कार्य करते.

महाविस्तार ॲप पारंपारिक शेती आणि आधुनिक तंत्रज्ञान यांच्यातील अंतर कमी करते. या ॲपमुळे शेतकऱ्यांचा वेळ व पैसा वाचवून उत्पादन वाढवण्यासाठी मदत होणार आहे. महाविस्तार ॲपमुळे हवामान अंदाज व बाजार भावावर आधारित तात्काळ निर्णय घेता येतो. पिकांसाठी योग्य खत विनियोजन करता येईल. तसेच कीडरोग नियंत्रणाच्या उपाययोजना वेळेवर राबविता येते. याशिवाय या माध्यमातून शेतकऱ्यांना शासकीय योजनांविषयी माहिती मिळणार आहे. शेतीसंबंधी समस्या सोडविण्यासाठी तज्ञांचे मार्गदर्शन मिळणार आहे आणि शेतकऱ्यांना डिजिटल तंत्रज्ञानाचा परिचय होणार आहे. ॲपच्या वापरामुळे शेतकऱ्यांचा उत्पादन दर्जा सुधारेल. शेती व्यवसाय अधिक सुलभ व परिणामकारक बनेल. तसेच संपूर्ण कृषी समुदायाला आधुनिक तांत्रिक माहिती एका क्लिकवर उपलब्ध करुन देऊन महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा व्यवसाय अधिक शिस्तबद्ध, सुरक्षित व लाभदायक करण्याचे कार्य करणार आहे.

ॲपमधील चॅट बॉटद्वारे शेतकऱ्यांना मराठी भाषेत प्रश्न विचारुन तात्काळ शासकीय स्त्रोतांकडून खात्रीलायक उत्तरे प्राप्त होतात. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात दिलासा मिळणार आहे. हे ॲप गुगल प्ले स्टोअरवर महाविस्तार ॲप डाउनलोड करुन आपला मोबाईल क्रमांक वापरुन सहज नोंदणी करुन शकतात. नोंदणी झाल्यानंतर ॲपमध्ये उपलब्ध सर्व सुविधा पूर्णपणे मोफत वापरता येतात. तसेच सर्वाधिक प्रश्न विचारणाऱ्या शेतकऱ्यांना लीडर बोर्डवर स्थान मिळेल. ज्याद्वारे शेतकऱ्यांमध्ये ज्ञानवर्धनासोबत स्पर्धात्मकता निर्माण होईल.

हिंगोली जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी व शेतकरी उत्पादक कंपन्यांनी आपल्या सर्व सभासदांकडून ॲप डाऊनलोड करावे आणि नियमितपणे या ॲपचा उपयोग करुन आधुनिक शेती तंत्रज्ञान आत्मसात करावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम यांनी केले आहे.

## सर्वच पक्षांचा मुस्लीम आणि दलित मतदारांवर डोळा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ नोव्हेंबर**

जिल्ह्यातील हिंगोलीसह वसमत आणि कळमनुरी या नगर पालिका क्षेत्रात मुस्लीम आणि दलीत मतदार मोठ्या प्रमाणात असल्यामुळे सर्वच राजकीय पक्षांचा मुस्लीम आणि दलीत मतदारांवर डोळा असल्याचे दिसत आहे.

हिंगोली, वसमत आणि कळमनुरी नगर पालिका निवडणुकीसाठी अवघे काही दिवस शिल्लक असतांना भाजप, शिवसेना शिंदगट, उबाठा शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या नगराध्यक्षपदाचे उमेदवार आणि पक्षातील नेते मंडळी आता शहरातील मुस्लीम बहुल आणि दलीत वस्त्यांमध्ये भेटीगाठी घेत असतांना आणि त्यांच्याशी संवाद साधत असतांना दिसत आहेत. सकाळी उठल्यापासून ते रात्री उशिरापर्यंत या भागामध्ये सर्वच पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते ठाण मांडून बसले आहेत. पक्षांच्यावतीने विकास कामांच्या वल्गना करीत आहेत.

नगरपालिका निवडणुका लागल्यामुळे या भागातील नेत्यांचे मात्र चांगले दिवस आल्याचे दिसत आहेत. परंतु यावेळी मुस्लीम आणि दलीत मतदार भाजप, शिवसेना शिंदे गट, उबाठा शिवसेना तसेच राष्ट्रवादी अजित पवार गट की महाविकास आघाडीकडे वळणार हे पाहणे औत्स्युक्याचे ठरणार आहे. सर्वच राजकीय पक्षांचा या मतदारांवर डोळा असून जोरदार प्रचार करीत असतांना दिसत आहेत.

## जिल्ह्यात वाचन संस्कृती बळकटीसाठी वाचन वीर प्रकल्प अंतर्गत ३१ मॉडेल शाळांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ नोव्हेंबर**



निपुण हिंगोली २.० अंतर्गत जिल्ह्यातील विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती वाढीस लागावी, तसेच स्पर्धा परीक्षा व शिष्यवृत्ती परीक्षांची सक्षम तयारी करता यावी यासाठी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या मार्गदर्शनाखाली 'वाचन वीर प्रकल्प' राबविण्यात येत आहे. यासाठी जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतून ३१ मॉडेल शाळांची निवड करण्यात आली आहे.

हिंगोली जिल्ह्यात एकूण ५ तालुके असून ८७७ जिल्हा परिषद शाळा आहेत. यामध्ये ८२ हजार ४७३ विद्यार्थी संख्या आहे. यामध्ये मुले ३९ हजार ९०१ व मुली ४२ हजार ५७२ आहेत.

वाचन वीर प्रकल्पांतर्गत निवडलेल्या ३१ मॉडेल शाळांमध्ये ८ हजार ८४७ एवढी विद्यार्थी संख्या आहे. यामध्ये ४ हजार ३९६ मुले व ४ हजार ४५१ मुलींचा समावेश आहे.

या प्रकल्पांतर्गत सर्व ३१ शाळांमध्ये वाचन कक्ष व सुसज्ज ग्रंथालये उभारण्यात येणार असून, या कक्षांमध्ये स्पर्धा परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा व सर्वांगीण अभ्यासासाठी आधुनिक, सुस्थित व वायुवीजनयुक्त वाचन कक्ष उपलब्ध असणार आहे. वाचन कक्ष २४७ खुले राहणार असून विद्यार्थ्यांना विद्यार्थी-अनुकूल सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

व्यवस्थापनासाठी क्लास मॉनिटर व शिक्षक-प्रभारी नियुक्त करण्यात येणार आहे. सतत वीजपुरवठ्यासाठी सौरऊर्जेवर आधारित कक्ष असणार आहे. पॉवर बॅकअपची सुविधा उपलब्ध असणार आहे. सध्या गावठाण फीडरवरील १२ ते १६ तासांच्या वीजपुरवठ्याऐवजी वाचन कक्षांसाठी पूर्णवेळ वीज मिळणार आहे. प्रत्येक शाळेला अंदाजे दीड लाख रुपये किमतीची पुस्तके उपलब्ध करून दिली जाणार आहेत. युपीएससी, एमपीएससी, पोलीस भरती, तलाठी भरती, एनडीए, आरआयएमसी, नीट, शिष्यवृत्ती परीक्षा आदी विषयांवरील पुस्तके समाविष्ट असणार आहेत. हे सर्व वाचन कक्ष ग्रामीण शाळांमध्ये उभारण्यात येणार आहेत. निवडणुका पूर्ण झाल्यानंतर वाचन कक्षांच्या बांधकामास सुरुवात करण्यात येणार आहे.

जिल्हा परिषद शिक्षण विभाग व जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्रकल्पास सातत्यपूर्ण मार्गदर्शन, विद्यार्थ्यांसाठी आवश्यकतेनुसार शंका समाधान सत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे. शनिवार व रविवार 'रीडिंग डे' कार्यक्रम राबवून कादंबरी वाचनास प्रोत्साहन दिले जाणार आहे, असल्याचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



नांदेड- सार्वजनिक ठिकाणी दारु पिऊन गोंधळ घालणाऱ्या भाग्यनगर, विमानतळ, वजिराबाद , इतवारा, ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ११ तळीरामांवर सिटी स्ट्रिट पथकाकडुन धडक कारवाई करण्यात आली.



## श्री दत्त जयंती यात्रा महोत्सव नियोजनाच्या तयारीची आढावा बैठक

**माहूर** -माहूर येथील दत्त शिखर गडावर पुढील महिन्यात ०४ डिसेंबर रोजी दत्त शिखर संस्थानकडून भगवान दत्तात्रेय प्रभु यांचा जन्मोत्सव म्हणजेच श्री दत्त जयंती यात्रा महोत्सव लाखो भाविकांच्या उपस्थितीत साजरा करण्यात येणार आहे. त्यानिमित्ताने देवदर्शनासाठी येणाऱ्या लाखो भाविकांच्या सोयी- सुविधेच्या दृष्टीकोनातून प्रशासनाकडून दि.२५ नोव्हेंबर रोजी दुपारी माहूर पंचायत समितीच्या कै. वसंतराव नाईक सभागृहात यात्रा नियोजनाच्या तयारीची आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत नायब तहसीलदार कैलास जेठे यांनी सर्व उपस्थित प्रशासकीय विभाग प्रमुख आणि प्रतिनिधींकडून आढावा घेत मार्गदर्शक सूचना केल्या. तसेच गैरहजर अधिकारी कर्मचाऱ्यांनी दि.२७ नोव्हेंबर रोजी सहाय्यक जिल्हाधिकारी जेनीत चंद्रा दोन्तूला यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या बैठकीला आपापल्या विभागाच्या यात्रा जबाबदारी व तयारीच्या अहवालासह सर्वांना उपस्थित राहण्याच्या सक्त सूचना केल्या. बैठकीस नायब तहसीलदार कैलास जेठे, नायब तहसीलदार अरुणा सूर्यवंशी, सपोनि शरद घोडके, सहाय्यक गटविकास अधिकारी पि.डी. मुरादे, उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग डि. के. भिसे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.आर. डी. माचेवार, एमएसइडीसीएलचे अभियंता आर.बी.शेंडे, वैद्यकीय अधिकारी डॉ.ए.डी. आंबेकर.आगार प्रमुख चंद्रशेखर समर्थवाड, राष्ट्रीय महामार्गाचे क.अभियंता ए. जी. हजारे, क.अभियंता पी. व्ही. हंचाटे, वनपाल एन. एन. कत्तुलवार,जी.एन. नाईक पो. का. गजानन जाधव, मंडळ अधिकारी चंदनकर, श्री दत्त शिखर संस्थांनचे सचिव प्राचार्य डॉ. गणेश पाटील ठेंगे,पं.स.चे एम.एम. लोणीकर, तलाठी सी.पी.बाबर देवदेवेश्वर संस्थानचे विश्वस्त एस.एल.कोथळकर,श्री रेणुका देवी संस्थानचे विश्वस्त दुर्गादास भोपी, श्री रेणुका देवी संस्थानचे व्यवस्थापक योगेश साबळे यांचे सह मान्यवर उपस्थित होते. यावेळी नायब तहसीलदार कैलास जेठे यांनी विभाग प्रमुखांना सक्त सूचना करून दरवर्षीप्रमाणे यात्रा नियोजनात कुठलीही कसर राहणार नाही याची दक्षता घेण्याचे आवाहन केले. तसेच २७ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या बैठकीत सर्वांनी दरवर्षीप्रमाणेच यात्रा नियोजनाच्या आढाव्यासह उपस्थित राहून यावर्षी भाविकांना सोयी सुविधा सुरक्षा मिळावी यासाठी काय नियोजन करण्यात आले याचाही तपशील सोबत घेऊन येण्याच्या सूचना केल्या.

## संविधान दिन साजरा करण्याचे निर्देश

**नांदेड** -भारतीय संविधानाची नागरिकांना माहिती असावी व त्यासंबंधी जनजागृती व्हावी या उद्देशाने दरवर्षी २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिवस म्हणून पाळण्यात येतो. जिल्ह्यातील सर्व विभाग प्रमुखांनी हा दिवस साजरा करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी नांदेड यांनी दिले आहेत. या दिनानिमित्त भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन शासकीय कार्यालये, महामंडळे, शाळा, महाविद्यालये इत्यादी ठिकाणी करण्यात यावे. तसेच वादविवाद स्पर्धा, निबंध स्पर्धा आयोजित कराव्यात. विद्यापीठामधून विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात यावे. तसेच शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना संविधानाची ओळख व्हावी यासाठी संविधानाविषयी जनजागृती व्हावी या उद्देशाने प्रभात फेऱ्यांचे आयोजन करावे. संविधानातील महत्वाची कलमे ठळकरित्या दिसतील असे बॅनर्स, पोस्टर्स वापरण्यात यावे. कोणत्याही प्रकारची तक्रार येणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करावा. या कार्यक्रमाचे आयोजन सर्व विभाग प्रमुखांनी करावे, असेही निर्देश जिल्हा प्रशासनाच्यावतीने दिले आहेत.

## एमबीबीएसला प्रवेश मिळाल्याबद्दल तेजस्विनी पुपलवाडचे अभिनंदन

**नवीन नांदेड** -महाराष्ट्र राज्य प्रवेश नियामक समितीद्वारे एम.बी.बी.एस. अभ्यासक्रमांच्या २०२५-२६ मध्ये राबविण्यात आलेल्या प्रवेश प्रक्रियेत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या परीक्षा विभागातील स्वीय सहाय्यक कैलास पुपलवाड व तसेच जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय सिडको नांदेड येथे सहा. प्राध्यापिका डॉ. सत्वाशीला वरगंटे (पुपलवाड) यांची मुलगी कु. तेजस्विनी पुपलवाड हिचा अनुसूचित जमातीच्या राखीव कोट्यातून मालती मेडिकल कॉलेज, मूर्तिजापूर अकोला येथे एम.बी.बी. एस. अभ्यासक्रमास प्रवेश मिळाल्याबद्दल तीचे आई व वडील, नातेवाईक, गुरुवर्य व मित्रमंडळी यांनी सर्वांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.



## विजयाबाई जहागिरदार यांचे निधन

**नांदेड-** ज्येष्ठ पत्रकार कालिदास जहागीरदार यांच्या मातोश्री आणि भाग्यनगरमधील ज्येष्ठ रहिवासी श्रीमती विजयाबाई माणिकराव जहागीरदार यांचे मंगळवारी दि. २५ नोव्हेंबर रोजी दुपारी २.१५ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्या ८४ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पार्थिवावर मंगळवारी रात्री ८.३० वाजता शांतीधाम स्मशानभूमी गोवर्धनघाट येथे अंत्यसंस्कर करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुले महेश, कालिदास,मुलगी सौ.प्राची गोसावी ,,जावई,२ सुना, नातवंडे,५ भाऊ,५ बहिणी असा मोठा परिवार आहे.




## टि.सी. हरवली

माझी शारदा रत्नाकर देशमुख या नावाची इयत्ता १२ उत्तीर्ण ची टि. सी.व मार्कमेमो नांदेड भोकर बस प्रवासात गहाळ झाली असून कूणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क करा.

**पत्ता**

**शारदा रत्नाकर देशमूख**

पत्ता - चिदगिरी, ता. भोकर, जि. नांदेड

मो.नं. ८८३०३९२४६४,७५५९१२१९७६


# इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे प्रसारीत करण्यात येणाऱ्या जाहिरातींचे प्रमाणीकरण करणे आवश्यक

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २५ नोव्हेंबर-**

नगर परिषद व नगरपंचायतीच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मुक्त, निर्भय, पारदर्शक आणि प्रत्येक राजकीय पक्ष व उमेदवाराला समान संधी मिळावी यासाठी राज्य निवडणूक आयोगाने माध्यम क्षेत्रातील सर्व नियमांचे काटेकोर अंमलबजावणी सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने व्यापक मार्गदर्शक सूचना आणि जाहिरातीतील आचारसंहितेचे पालन बंधनकारक करण्यासाठी जिल्हा व राज्यस्तरावर माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समित्या कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेली आहे. उमेदवारांमार्फत प्रचारासाठी इलेक्ट्रॉनिक / सोशल मिडीयास देण्यात येणाऱ्या जाहिरांतीचे पूर्व प्रमाणीकरण या समितीमार्फत केल्या जाते.

महाराष्ट्र शासनाच्या ९ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या अधिसूचनेनुसार सर्व प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे प्रसारित/प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक विषयक प्रस्तावित जाहिरातींचे प्रसारमाध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीकडून पूर्व प्रमाणन करून घेणे आवश्यक आहे. इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये दूरदर्शन, उपग्रह वाहिन्या, केबल वाहिन्या, यूट्यूब वाहिन्या, केबल नेटवर्क, आकाशवाणी, खासगी एफएम वाहिन्या, चित्रपटगृह, सार्वजनिक ठिकाणचे दृकश्राव्य फलक (ऑडीओ व्हिज्युअल डिसप्ले), ई-वृत्तपत्रे, बल्क एसएमएस, व्हाइस एसएमएस, समाजमाध्यमे, संकेतस्थळे आदींचा समावेश होतो.

मुद्रित माध्यमांद्वारे प्रसिद्ध करावयाच्या जाहिरातींचे पूर्व प्रमाणन करण्याची आवश्यकता नाही. परंतु, अशा माध्यमातून जाहिरातील प्रसिध्द करताना आचारसंहिता किंवा कोणत्याही कायद्याचे उल्लंघन होता कामा नये. तसेच, इतर प्रत्येक मुद्रित साहित्यावर प्रकाशक, मुद्रणालय, पत्ता, प्रत क्रमांक आणि प्रत संख्या नमूद असणे बंधनकारक आहे. उल्लंघन आढळल्यास प्रेस ॲक्टसह लागू प्रचलित कायद्यांनुसार कारवाई होईल. संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर मुद्रित, इलेक्ट्रॉनिक, समाजमाध्यमे आदी माध्यमाद्वारे कोणत्याही प्रचारविषयक जाहिराती देता येणार नाहीत.

अर्जाचा नमुना व आवश्यक माहिती जिल्हा माहिती कार्यालय, नांदेड, पार्वती निवास, खुरसाळे हॉस्पिटल, यात्री निवास रोड, बडपूरा नांदेड येथून उपलब्ध करून घेता येईल. अर्जासोबत जाहिरातींची इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील प्रत (पेनड्राईव्ह) आणि साक्षांकित जाहिरात संहिता जोडणे बंधनकारक आहे. जाहिरातींची कोणतीही देयके धनादेश, धनाकर्ष ऑनलाईन पद्धतीने अदा करण्यात येतील. अन्य भाषांतील जाहिरातींसाठी मराठी अनुवादित साक्षांकित केलेली प्रत व नोटराईज्ड अनुवाद प्रत जोडणे आवश्यक आहे.

# शिक्षकांनी अंतर्मुख होण्याची गरज: माजी कुलगुरू डॉ. बंडगर

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २५ नोव्हेंबर-**

एक पुस्तक शंभर शिक्षकांच्या बरोबरीचे असते आणि एक चांगला शिक्षक संपूर्ण ग्रंथालयाच्या तोलामोलाचा असतो, अशी व्याख्या आपण ऐकत आलो आहोत. पूर्वी शिक्षकांची अध्यापनशैली देणगीभावाने आणि निष्ठेने परिपूर्ण होती. मात्र काळाच्या ओघात शिक्षणव्यवस्थेमध्ये आणि शिक्षकांच्या भूमिकेमध्ये मोठे बदल झाले आहेत. आजच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती पाहता शिक्षकांनी स्वतःकडे अंतर्मुख होण्याची तातडीची गरज आहे, असे प्रतिपादन सोलापूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू तथा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील रसायनशास्त्र संकुलाचे माजी संचालक डॉ. बी. पी. बंडगर यांनी केले.

ते दि. २२ नोव्हेंबर रोजी विद्यापीठाच्या अधीसभा सभागृहात आयोजित कुलगुरू



व्याख्यानमाला या कार्यक्रमातील पहिल्या व्याख्यानात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन होते. यावेळी समन्वयक डॉ. एस. जी. गट्टानी, डॉ. कृष्णा चैतन्य, रसायनशास्त्र संकुलाच्या संचालिका डॉ. संगीता माकोणे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले असून पहिल्या पुष्पात डॉ. बंडगर यांनी जगावे तरी कसे! या विषयावर प्रेरणादायी व्याख्यान दिले.

आपल्या प्रभावी संवादात ते म्हणाले की, आयुष्य तीन गोष्टींकडून प्रेरणा घेऊन जगावे. निसर्गाकडून : निरपेक्ष भावनेने जगणाऱ्या आणि कोणताही मोबदला न घेता ऊर्जा देणाऱ्या निसर्गाकडे पाहून जगण्याची प्रेरणा मिळते. मित्रांकडून : जीवनातील वेदना कमी करणारे, सदैव मदतीसाठी धावून येणारे खरे मित्र जीवनाला अर्थपूर्ण करतात. शिक्षकांकडून : जगावे कसे हे शिकवणारे, जीवनाला दिशा देणारे शिक्षक आपल्याला घडवत राहतात आणि त्यांच्या कृतज्ञतेखालीच आपण मोठे होत जातो. आपल्या जगण्याने इतरांना हेवा वाटावा असे जगावे, असा प्रेरणादायी संदेश देत त्यांनी व्याख्यानाचा समारोप केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन रसायनशास्त्र संकुलाच्या संचालिका डॉ. संगीता माकोणे यांनी केले.

# भाजपा उमेदवारांच्या प्रचारार्थ सचिन साठे यांचा २८ रोजी धर्माबाद दौरा

**तभा वृतसेवा**
**धर्माबाद, दि. २५ नोव्हेंबर-**

डॉ.अण्णा भाऊ साठे यांचे वंशज सचिन साठे यांचे भाजपच्या उमेदवारांच्या प्रचारर्थ २८ नोव्हेंबर रोजी धर्माबाद येथे आगमन होणार आहे. त्यांच्या स्वागताची जोरदार तयारी संघटनेचे पदाधिकारी व समाजबांधव करतआहेत.

धर्माबाद नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक च्या अनुषंगाने भाजपा उमेदवारांच्या प्रचारार्थ २८ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता अण्णाभाऊ साठे चौक येथे डॉ अण्णा भाऊ साठे क्रांती सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा वंशज सचिन साठे , जिल्हाध्यक्ष पंडित वाघमारे, महीला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा सुकमलाताई वाघमारे, जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी बोयणर, जिल्हा उपाध्यक्ष द्रोताई कांबळे, आदींची उपस्थिती रहाणार आहे.

डॉ.अण्णा भाऊ साठे क्रांती सेना धर्माबाद तालुकयाच्या वतीने मा. सचिन साठे यांच्या आगमना निमित्त स्वागताची जोरदार तयारी संघटनेचे तालुकाध्यक्ष अनिल जुळणे, युवक अध्यक्ष शंकर वासणीकर, शहरं अध्यक्ष गणेश जटाळकर, सचिव मंगेश गायकवाड, चंद्रकांत पवार,विजय भंगारे, विकास कमलाकर, आदी परिश्रम घेत आहेत.

# हदगावात नगरपरिषद निवडणूकच्या निमित्ताने काँग्रेसचा धडाकेबाज प्रचार



**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. २५ नोव्हेंबर-**

हदगाव नगर परिषदेच्या निवडणुकीसाठी राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने धडाकेबाज प्रचार सुरू असून माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर हे शहरात तळ ठोकून प्रचारात सहभाग घेत आहेत तर आज नगराध्यक्षपदाचे उमेदवार सौ. कुमुद सोनुले यांच्या प्रचारार्थ सुनील सोनुले यांनी प्रभाग क्रमांक २ येथील प्रभागाचे काँग्रेसचे अधिकृत उमेदवार शेख कलीम चांद व रुकसाना बेगम अहमद खान यांच्यासाठी मतदारांशी संवाद साधताना दिसत आहेत त्यास मतदारांचा देखील चांगलाच पाठिंबा भेटत असल्याचे निदर्शनास येत आहे. नगराध्यक्ष पदा सहित २० उमेदवारांच्या प्रचारासाठी विविध प्रभागात कॉर्नर बैठका थेट मतदारांपर्यंत पोहोचविण्याची तंत्र अवलंबल्याचे रणनीती सध्या तरी काँग्रेस पक्षाची दिसत आहे.

हदगाव शहरातील प्रत्येक भागात माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांच्यासह सुनील सोनुले, काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, जेष्ठ कार्यकर्ते , युवा कार्यकर्ते हे नगराध्यक्ष व प्रभागातील उमेदवार यांच्या प्रचारास जोमाने लागले असल्याची परिस्थिती पहावयास भेटत आहे. नगरपालिका निवडणुकीची प्रचाराची धुरा माजी आमदार जवळगावकर यांनी सांभाळली आहे त्यामुळे त्यांच्या प्रचारात शेकडो नागरिक प्रतिसाद देत असताना दिसत आहेत दुसरीकडे विरोधकांच्या गोटात मात्र खळबळ माजली आहे. माजी आमदार जवळगावकर व सुनील सोनुले यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते जनतेशी थेट संवाद साधत त्यांच्या समस्या तसेच अडीअडचणी मागच्या वेळेस केलेली विकास कामे व भविष्यात करण्याचा विकास कामांबद्दल माहिती देत असताना दिसत आहेत.



# तामसा येथील राम मंदिरात महाआरतीला राम भक्तांची गर्दी

**तभा वृतसेवा**
**तामसा, दि. २५ नोव्हेंबर-**

तामसा येथील राम मंदिरात अयोध्येतील राम मंदिरावर ध्वजारोहणाच्या औचित्याने घेण्यात आलेल्या महाआरतीला प्रतिसाद मिळाला असून रामभक्तांनी आरती व दर्शनासाठी मंदिरात गर्दी केली होती.

यानिमित्त सुमनबाई निलावार यांच्या हस्ते मंदिर परिसरातील नव्या भरवण्यात आलेल्या ध्वजाचे पूजन करून अनावरण झाले. मंदिरातील श्रीराम सीता लक्ष्मण यांच्या मूर्तीची सामूहिक आरती झाली. मंदिर परिसर जयश्रीरामच्या घोषणांनी दणाणून गेला होता. यावेळी बालाजी मंदिराचे विश्वस्त स्वप्निल बंडेवार यांनी अयोध्येतील मंदिरावरील ध्वजाची माहिती सांगितली.यावेळी मंदिराचे पुजारी अमोल तामसेकर, भाजपाचे तालुकाध्यक्ष भागवत देवसरकर ज्येष्ठ व्यापारी दीपक बंडेवार,शशिकांत बंडावार, सचिन तांदळे, बाजार समितीचे माजी उपसभापती विशाल परभणकर, भाजप शहराध्यक्ष शिवराज वारकड, दीपक देशमुख, भाजप पदवीधर प्रकोष्ठ महेश मठपती, अर्जुन जोशी, गजानन लाभसेटवार, डॉ. दीपक नाईक, गणेश शिंदे, किरण वारकड, अमोल वाळकीकर, आशिष बीजमवार यांच्यासह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# मुस्लिम समाजाच्या वस्तीत जाऊन त्यांची सुख-दुःख जाणून घेतले पाहिजे : आ. हेमंत पाटील

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २५ नोव्हेंबर-**

शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा परिषदेचे इच्छुक उमेदवार उद्धव पाटील शिंदे शिवसेना तालुकाप्रमुख दक्षिण नांदेड यांच्या जनसंपर्क कार्यालयाचा शुभारंभ दिनांक २३ नोव्हेंबर रोजी लातूर फाटा वाजेगाव या ठिकाणी करण्यात आला याप्रसंगी बोलताना हेमंत पाटील त्यांनी पदाधिकाऱ्यांना सांगितले की मुस्लिम वस्तीत जाऊन त्यांच्या सुखदुःखाची विचारपूस करणे हे आपले कर्तव्य आहे आणि यामुळे सर्व समाजाशी मैत्रीपूर्ण संबंध राहतील जेणेकरून ते आपले हितचिंतक बनतील.

आगामी चालू असलेल्या जिल्हा परिषद निवडणुका २०२५ यांच्या लगबगीचा



कार्यक्रम इच्छुक उमेदवारांमध्ये चालू असल्याने उमेदवार आपल्या सर्कलमध्ये जाऊन मतदारांशी भेटीगाठी घेऊन आपली बाजू मजबूत करत असल्याचे दिसून येते या निवडणूक संबंधी धनेगाव सर्कलचे इच्छुक उमेदवार शिवसेना तालुका अध्यक्ष दक्षिण नांदेड यांच्या जनसंपर्क कार्यालयाच्या शुभारंभ आ. हेमंत पाटील व दक्षिणचे आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी या कार्यक्रमाचे प्रास्तावित इच्छुक उमेदवार अनुराधा उद्धव पाटील शिंदे यांनी केले तर तालुका अध्यक्ष उद्धव पाटील शिंदे यांनी आपल्या मनोगतात मला पक्षश्रेष्ठीने संधी दिल्यास मी आ. हेमंत पाटील व आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या मदतीने या सर्कलमध्ये विकासात्मक कामे करून या सर्कलचा कायापालट करू असे मत व्यक्त केले. त्यानंतर आमदार बोंढारकर यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व आ. हेमंत पाटील यांचे हात बळकट करण्यासाठी धनुष्य बाणास निवडून द्या. दक्षिण मतदारसंघ हा शिवसेनेचा बालेकिल्ला आहे आणि ते राहणार असा विश्वास दर्शविला जनतेची साथ झाल्यास दक्षिणचा कायापालट करून टाकू असेही मत मांडले. पुढे बोलताना आ. हेमंत पाटील म्हणाले की आता उमेदवार आम्ही निवडायचा नाही तर ते मतदारांनी निवडायचा आहे. हे काम आमच्यासाठी सोपे झाले आहे हे काम मी जनतेवर सोपवणार आहे तुम्ही आशीर्वाद देऊन धनुष्यबाणाला ४ ही सर्कलमधून विजयी करा व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे हात बळकट करा असे आव्हान मतदारांना या जनसंपर्क कार्यालयाच्या शुभारंभ प्रसंगी बोलत होते. यावेळी मंचावर रावसाहेब महाराज घनेगावकर, तुळजेश यादव,विनय गिरडे, बाळू पाटील मोरे, अशोक मोरे, शिवाजी कदम, बालाजी पाटील भायगावकर डॉक्टर बालाजी पवार संभाजी पवार, बालाजी भंगारे, बबन जोंधळे यांची उपस्थिती होती तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौतम पवार यांनी केले या कार्यालयाच्या शुभारंभ प्रसंगी सर्कल मधील हजारो शिवसैनिकांची उपस्थिती होती.